# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ११ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७४**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ११ / ऑक्टोबर २००३

## संपादकीय

### नित्य दिवाळी-दसरा

पुण्यातल्या पुणे फेस्टिव्हल, मागोमाग नवरात्रतला 'मराठी दांडिया' (?), विजया दशमी कार्निव्हल... हे आणि असे कितीतरी शब्द आता इतके सरावाचे झाले आहेत की सणावारांच्या संकल्पना पार बदलून चालल्या आहेत याचेही भान हरवून चालले आहे. हॅपी दिवाळी, हॅपी संक्रांत, हॅपी मातृदिन अशा शुभेच्छा लोक देतात तेव्हा सर्व कसं हॅपीच हॅपी वाटायला लागतं. या शुभेच्छांची परतफेड 'सेम टू यू' म्हणत केली जाते. यातील से चा शे झाला तर फारसं वाटत नाही. 'या सेम टू यू'चीही इतकी सवय झाली आहे की एकदा मित्राला फोनवरून 'बर्थ डे विशेस्' दिल्या. चक्क 'हॅपी बर्थ डे' म्हणून ! तर तो पलीकडून लगेच म्हणाला, 'सेम टू यू.'

खरे तर पूर्वी या सणावारांना असणारे सांस्कृतिक मूल्यच हरवले आहे. अनेकदा प्रश्न पडतो, आज मुद्दाम थांबून सण करायला हवेतच का? की केवळ परंपरा म्हणून सवय म्हणून आपण हे करतोय. पूर्वी माणसांच्या वसाहतीत इतकं अंतर होतं की माणसं एकमेकांना नित्यनेमानं भेटू शकत नसत. सण, वार, धार्मिक विधी या निमित्ताने आप्तेष्ट एकत्र येत. गोडधोड खात, शुभ चिंतीत. त्यामुळे सणावारांचं अप्रूप होतं, आकर्षण होतं पण आज परिस्थिती बदलली आहे. वर्षाचे ३६५ दिवस माणसं सतत भेटतात. प्रत्यक्षात नाही तरी दूरध्वनी, चॅटिंग इ. सुविधांमुळे माणसं भेटतात. गोडधोड तर गल्लोगल्ली, रस्तोरस्ती पॅकबंद स्वरूपात रोजच मिळतं. कपडे ही माणसांची गरज होती. सणावाराच्या निमित्ताने नवं घालण्याची परंपरा होती. आज माणसं ही कपड्यांची गरज ठरली आहे. वापरा आणि फेका या तत्त्वज्ञानामुळे वर्षभर कपड्यांचा बाजार ओथंबलेला असतो.

जागतिकीकरण, जगाचं खेडं... काहीही वर्णन करता येईल. पण शहरीकरण वाढलं, वाढतच आहे त्यामुळे सांस्कृतिक संचितांच्या सीमारेषा अस्पष्ट होत चालल्या आहेत. परंपरांच्या ट्रेडिशन्स झाल्या. रोजच सण, रोजच दिवाळी. रोजच दिवाळी करणारं हे जग एकीकडे आणि दिवाळीलाही दिवा पेटत नाही असं जग दुसरीकडे ! त्या जगाबद्दल काय बोलायचं ? कचऱ्याचे ढीग उपसणारी मुले पाहिली, एखाद्या प्लॅस्टिकचा श्रीखंड राहिलेला डबा चाटणारी मुलं पाहिली, न उडलेला एखादा फटाका कचऱ्यात सापडला की त्याच्यासाठी भांडणारी, फक्त शिव्यांची भाषा बोलणारी मुलं पाहिली की मेंदूत प्रश्नांचा गुंता निर्माण होतो. शुभेच्छा तर द्याव्या वाटतात... पण या जगाचं काय? तरीही आपल्या कल्चरची ट्रॅडिशन आहे म्हणून - दीपावलीच्या शुभेच्छा !



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ११ / ऑक्टोबर २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

## अनुक्रमणिका



| | | | |
|---|---|---|---|
| १) | शक्ती उपासना | श्री. शंकर बा. मठ | ३ |
| २) | ग्रंथ विश्व | श्री. शरद जोशी | १० |
| ३) | बऱ्याच वर्षांनी उगवलेले 'श्वेतकमळ' | श्रीमती आशा भिडे | १७ |
| ४) | फेंगशुई - समतोल, समृद्ध आणि संपन्न जीवनाचे एक प्राचीन शास्त्र | प्रदीप प. हळवे | १९ |
| ५) | ५ सप्टेंबर-शिक्षक दिन | सौ. शोभना श. मराठे | २१ |
| ६) | नियमित योगासने | श्री. गोविंद साठे | २३ |
| ७) | उपरा | - | २५ |
| ८) | परिसरवार्ता | संकलित | ३२ |



**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# शक्ती उपासना

*देवीच्या नवरात्रात भारतभर देवीच्या विविध रुपांतील मूर्तीपूजा केली जाते. ही पार्थिव मूर्ती माध्यम असून तिच्या माध्यमातून आपण शक्तीची उपासना करीत असतो. - संपादक*

### शक्ती उपासना प्राचीन काळापासून

सृष्टीच्या उत्पत्ती कालापासून शक्ती उपासने व्यतिरिक्त दुसरी उपासना अस्तित्वात नव्हती. युग परत्वे या उपासनेची नावे बदलत गेली. सत्य युगात ही उपासना निर्गुणाची उपासना होती. तेव्हा मूर्तीचा उगम झालेला नव्हता. अत एव निर्गुण उपासना हीच आदीम व श्रेष्ठ उपासना मानली जाते. या निर्गुण उपासनेमुळे ऋषिमुनींना अतर्क्य सामर्थ्य प्राप्त झाले होते. द्वापार युगात या विद्येला ब्रह्मविद्या असे नाव झाले. त्रेतायुगात तिला श्रीविद्या म्हणू लागले. कलियुगात आदि शक्ती विद्या म्हणजे शक्तीची उपासना असे म्हणण्यात येऊ लागले.

वेद काळी सगुण मूर्तीची पूजा अस्तित्वात नव्हती. यज्ञ यागादी धार्मिक विधीत मूर्तीचे प्रतीक नसून निर्गुणाची पूजा केली जात असे. चैतन्य शक्ती विविध रूपाने नटली असून त्या त्या रूपात तिचे विशिष्ट गुण प्रकट होताना आढळतात. पंच महाभूतांच्या चैतन्य शक्ती निरनिराळ्या आहेत. त्या गुणांची पूजा होत असे. (गुणा: पूजा स्थानं) कालांतराने त्या गुणांचे प्रतीक म्हणून, त्या गुणांच्या दृश्य परिणामावरून तशा प्रकारच्या मूर्ती बनविल्या गेल्या. अशाप्रकारे मूर्तीपूजा अस्तित्वात आली.



### मूर्ती मानवाने घडविल्या

या मूर्ती मानवाने घडविल्या. म्हणूनच निर्गुण उपासक मूर्तीची पूजा करण्यास तयार होत नाहीत. निर्गुण पूजेचे तत्त्व बहुजन समाजाला पचणारे व भावणारे नसल्याने सर्वंकष विचार करून समाजाला त्याच्या ज्ञानाच्या पातळीला आकलन करता येईल अशी व्यवस्था केली. त्यांना आचरण्यास सुलभता येईल अशी उपासना पद्धती सांगितली. हीच गोष्ट पुढील काळात वाढीला लागली.

### मूर्ती व चैतन्य आणण्याची विद्या

निर्गुणातून मूर्ती पूजेकडे वळत असताना केवळ साकारतेचीच पूजा न सांगता त्या मूर्तीत प्राण आणण्याची, खऱ्या अर्थाने जागृत बनविण्याची विशिष्ट योजना कृतीमध्ये आणली. त्या मूर्तीत पंचतत्त्वांच्या मंत्रांचा उच्चार करून त्यामध्ये चैतन्य निर्माण करण्याची व्यवस्था केली. यालाच ते प्राण प्रतिष्ठा असे म्हणू लागले. निर्जीव पाषाणाच्या वा धातूच्या मूर्तीला सजीवता प्राप्त करून देणारी विद्या अथवा शक्ती या सगुण उपासनेच्या आधीपासून अस्तित्वात होती. मूळ चैतन्य शक्तीपासून उत्पन्न झालेले पंचतत्व अथवा पंचमहाभूते यांची उपासना सुरू झाली. सांप्रतही पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यांची पूजा करणारे लोक आहेत. म्हणजे ते निर्गुण उपासकच आहेत.

**तंत्र उपासना - निर्गुणोपासना**

तंत्र उपासक मूर्ती पूजा न करता यंत्राची पूजा करतात. पंचमहाभूताना प्रथम मंत्रात आणले गेले आणि नंतर यंत्रांची प्रतीकात्मक रेखाटणे साकार झाली. त्यामुळे बहुतेक देवतांची यंत्रे आहेतच. म्हणजे यंत्र पूजा ही मूर्ती पूजेच्या आधीची आहे. त्या सर्व यंत्रात श्री यंत्र हे प्रमुख व सर्वश्रेष्ठ मानलेले आहे. या एकाच यंत्रावर स्त्री व पुरुष या दोघांचे आवाहन केले जाते. फक्त त्याची मांडण्याची पद्धत वेगळी आहे. यंत्र पूजा ही निर्गुण व सगुण यांच्या मधली मानली असून त्याच्या एकाग्र चित्ताच्या पूजनाने व सातत्याने ही पायरी आपोआप गळून पडते. पूजक निर्गुणाच्या पूजनेला प्राप्त होतो याला आत्मचित अशी संज्ञा आहे. शक्तीपूजकात ही सर्वश्रेष्ठ परमोच्च स्थिती मानली जाते. या स्थितीला पोहोचलेल्याला निर्गुण उपासक असे म्हणतात.

**श्री यंत्राबद्दल संक्षिप्त माहिती.**

श्री यंत्र सर्व यंत्रात श्रेष्ठ असून त्याचे तीन प्रकार आहेत. ते उत्पत्ति स्थिति आणि लय यावर आधारित आहेत. त्या प्रकारानी पूजक यंत्राचे पूजन करतो. त्यामधील प्रमुख भेद ऊर्ध्व रेखी व अधोरेखी यात आहे. परंतु अधोरेखेने यंत्र पूजू नये. ऊर्ध्व रेखा ठळक रीतीने वर रेखा उमटून दिसणारे यंत्र होय आणि हेच पूजनीय. या यंत्रात ४५ त्रिकोण असतात. विविध देवतांची आवाहने ठराविक त्रिकोणातच करावयाची असतात. असे आवाहन योग्यवेळी योग्य ठिकाणी न झाल्यास उपासकाला भयंकर यातना सहन कराव्या लागतात. शेवटी देहदंड भोगावा लागतो. यासाठी सर्व सामान्य माणसाना श्रीयंत्राची पूजा सांगितलेली नाही. पूजक परम संयमी गृहस्थ असला पाहिजे. तरच हे पूजन करू शकतो.

या यंत्राचा मुख्य भाग म्हणजे केन्द्र स्थानीचा शक्तीत्रिकोण होय. या त्रिकोणाच्या तीन कोनाला रज, सत्व, तम, स्वर्ग, मृत्यु, पाताळ, ब्रह्मा, विष्णु, महेश, काली, लक्ष्मी, सरस्वती, इत्यादी अनंहत त्रयीची नावे दिली असून त्रिकोणाचे मध्यभागी असलेला बिंदू हाच परमोच्च भाव होय. कारण या बिंदुमध्येच अद्वैत रूपाने निर्गुणत्वाचे शिव-शक्तीचे पूजन होते.

**शक्तीचे वर्णन**

त्वमेव सर्व जननी मूल प्रकृतिरीश्वरी । त्वमेवाद्या सृष्टिविधौ स्वेच्छया त्रिगुणात्मिका ॥१॥

कार्यार्थे सगुणत्वं च वस्तुतो निर्गुणा स्वयम् । परब्रह्म स्वरूपा त्वं सत्या नित्या सनातनी ॥ २ ॥

तेजस्वरूपा परमा भक्तानुग्रह विग्रहा । सर्व स्वरूपा सर्वेशा सर्वधारा परात्परा ॥ ३ ॥

सर्व बीज स्वरूपा च सर्व पूज्या निराश्रया । सर्वज्ञा सर्वतो भद्रा सर्वमंगल मंगला ॥ ४ ॥

(ब्रह्मवैवर्त पुराण)

निर्गुण स्वरूप देवी प्राणिमात्रावर दया करण्यासाठी, सगुण रूपात अवतरते. ब्रह्मा, विष्णु, महेश, उत्पत्ती स्थिति, संहार ही कार्ये करते. तीच विश्व जननी मूल प्रकृति ईश्वरी आद्य शक्तीच्या स्वरूपात विराजमान असते व सर्व काही तीच आहे असा वरील श्लोकांचा सारांश आहे.

**ब्रह्मण: द्वे रूपे**

ब्रह्मतत्व चेतनशक्तीचे दोन प्रकार - सगुण व निर्गुण. सगुणात दोन प्रकार - निराकार व साकार. प्रथम साकार रूप आत्मसात झाल्यावर मग मानव निराकाराकडे वळू शकतो. त्या पायरीवरचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर तो निगुर्णाकडे वळू शकतो. एकदम कोणालाही ही पायरी झेपावयाची नाही. निराकार सगुण रूपे - वायु, आकाश, मन, प्राण इत्यादी. विष्णु पुराणात म्हटले आहे.

विष्णु शक्ती पराप्रोक्ता क्षेत्रज्ञारव्या तता अपरा । अविद्या कर्म संज्ञा अन्या तृतीयाशक्तीरिष्यते ।

### तेजापासून देवता निर्मिती

राक्षसानी मानवाला त्रास द्यावा त्याचा विनाश करण्यासाठी देवानी वरिष्ठ देवांची प्रार्थना करावी आणि त्यानी आपल्या तेजापासून देवीची उत्पत्ती करावी. महिषासुराच्या धुमाकुळाला कंटाळून देवांच्या प्रार्थनेनंतर ब्रह्मा विष्णु महेश यानी आणि इतर देवानी आपले तेज एकवटून व विविध आयुधासह जी आकृती तयार झाली तीच महिषासुर मर्दिनी होय. त्या काळी तेजापासून मानवी प्रतिकृती निर्माण होऊ शकत होती.

याबद्दलचे वर्णन देवी अथर्वशीर्षात आले आहे.
सर्वे ते देवा: देवं उपतस्थु: । का असित्वं महादेवि इति । सा अब्रवीत् - अहं ब्रह्म स्वरूपिणी । भत्त: प्रकृति पुरुषात्मक: जगत् ।

देवीला पाहून इतर सारे देव तिला सामोरे गेले. ते म्हणाले हे महादेवी तू कोण आहेस ती म्हणाली, मी ब्रह्म आहे. माझ्यापासून प्रकृति पुरुषयुक्त जगाची निर्मिती झाली आहे.

ऋग्वेदात मंडल १० सूक्त १२५ वाक् आंभृणीय सूक्त असे याला नांव आहे. आंभृणीय ऋषींची कन्या वाक् हिच्या मुखातून या सूक्ताची रचना झाली आहे. ती म्हणते,

ॐ अहं रुद्रेभि: वसुभि: चराम्यहमादित्यै: उत विश्वदैवै: ।
अहं मित्रावरुणोभा बिभर्मि अहं इन्द्राग्नी अहंअश्विनोभा । ऋ १०-१२५-१

मी अकरा रुद्र, आठ वसु, बारा आदित्य, विश्वदेव तसेच मित्र वरुण, इंद्र, अग्नी व दोन अश्विनी याच्यासह सर्वांना धारण करत कालक्रमणा करत राहते. (थोडक्यात सर्व देव माझ्यामुळे स्थानापन्न झालेले आहेत.)

अहं राष्ट्री सङ्गमनी वहूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम् ।
तां मा देवा व्यदधु: पुरुमा भूरिस्थात्रां भू: या वेशयन्तीम् । १०.१२५.३

मी ब्रह्मांडाची ईश्वरी आहे, मी उपासकाना इष्ट फल देणारी आहे. मी सदा सर्वदा टेहळणी करत असते. मी उपासक देवतात प्रधान (प्रमुख) आहे. मी सर्व प्राणिमात्रात अंतर्भूत आहे. ब्रह्मांडात सर्व देव जे काही कर्म करतात ती सारी माझी आराधना आहे.

### देवीचे महत्त्व -

शिव देवीला म्हणतात -
ईश्वरोऽहं महादेवि केवले शक्तीयोगत: ।
शक्तिविना महेशानि भवामि शव रूपक: ।
शक्तीयुक्तो यदा देवि शिवोऽहं सर्व कामद: ।

देवी तुझ्या शक्ती सामर्थ्यामुळे मी सर्वांचा ईश (शासक) बनलो आहे. तुझ्या शक्तीसामर्थ्यावाचून मी केवळ शव (बलहीन, अचेतन) आहे. ज्या क्षणी मी तुझ्या शक्तीसामर्थ्याने युक्त होतो. तेव्हाच मी शिव म्हणजे सर्वांचे कल्याण करणारा व त्यांचे मनोरथ पूर्ण करणारा होतो. श्वेताश्वेतर उपनिषदात असे म्हटले आहे. मायां तु प्रकृतिं विद्यात् मायिनं तु महेश्वरम् ।

तस्य अवयव भूतै: तु व्याप्तं सर्वं इदं जगत् । देवी वा प्रकृति. हिलाच माया असे (ईश्वरी शक्ती) म्हटले आहे. महेश्वर हा मायेने युक्त असतो. त्यांच्या अंग प्रत्यंगाच्यामुळे हे सारे विश्व व्याप्त आहे.

यावरून फार प्राचीन काळापासून तसेच वेद व उपनिषदातूनही शक्ती संबंधीची संपूर्ण कल्पना आपल्या ऋषी मुनींना होती हे ध्यानात येईल.

### महाकाली - या देवीची उत्पत्ती

श्री भगवान विष्णु योग निद्रेत असताना त्यांच्या कर्ण मलाच्या विवरातून मधुव कैटभ दैत्यांची उत्पत्ती झाली.

ते उभयता ब्रह्माच्या नाशासाठी धावले. ब्रह्मा विष्णुकडे आला. त्यावेळी विष्णू योगनिद्रेत होता. म्हणून ब्रह्माने योगनिद्रामातेची स्तुती केली आणि विष्णुला जागे करण्याची विनंती केली. तिने विष्णुवरून मायेचे आवरण काढून घेताच विष्णु जागा झाला. समोर दैत्य उभे ठाकले होते त्याना पाहून त्यांच्याशी युद्ध केले. युद्ध बरेच दिवस चालले. परंतु दैत्य पराभूत होण्याचे चिन्ह दिसेना. त्यावेळी महामायेने त्या दैत्याना मोहित केले. दैत्य विष्णूला म्हणाले आम्ही तुझ्या पराक्रमावर खूष आहोत. काही वर माग. ही संधी साधून विष्णूने त्याना म्हटले, माझ्या हातून तुमचे मरण व्हावे. त्यास त्यांनी मान्यता दिली. सुदर्शन चक्राने त्यांचे हनन केले.

या प्रमाणे देव कार्यात जिने भाग घेतला ती देवी महाकाली. तिचे वर्णन असे आहे. दशभुजा हातात खड्ग, चक्र, गदा, धनुष्य बाण, शूल, कपाल व शंख ही आयुधे आहेत. नीलमण्याप्रमाणे अंग कांती आहे. वस्त्रालंकार विभूषित अशी देवी आहे. महाकालीची दोन स्थाने कोकणात रत्नागिरी जिल्ह्यात आडिवरे आणि अडूल या ग्रामी आहेत.

**महासरस्वती उत्पत्ती -**

घण्टा शूल हलानि शंख मुसले चक्रं धनुः सायकम् ।
हस्ताब्जैः दधती घनान्त विलसत् शीतांशु तुल्य प्रभाम् ।
गौरी देह समुद्भवां त्रिनयनां आधारभूतामहम् ।
पूर्वामात्र सरस्वतीं अनुभजे शुंभादि दैत्यार्दिनीम् ।

अष्टभुजामध्ये घंटा, त्रिशूल, हल, शंख, मुसळ, चक्र, धनुष्य आणि बाण धारण करणारी. गौरीच्या (पार्वतीच्या) देहापासून उत्पन्न झालेली, त्रिनेत्रा चंद्राप्रमाणे कांती असणारी संसाराची आधारभूता आणि शुंभादि दैत्यांचे निर्दालन करणारी अशी ही महासरस्वती देवी. हिला माझा नमस्कार असो. पार्वती अत्यंत रूपवान असल्याने शुंभ निशुंभानी तिला लग्नासाठी मागणी घातली. तिने त्याना उत्तर धाडले -

यो मां जयति संग्रामे यो मे दर्पं व्यपोहति ।
यो मे प्रतिबलो लोके स मे भर्ता भविष्यति ।

जो कोणी मला युद्धात जिंकेल व माझा अभिमान नष्ट करेल, माझ्या तुल्य प्रतिस्पर्धी जो उभा राहील तोच माझा पती होईल. हे ऐकून चंड व मुंड तिच्यावर धावून गेले व स्वतः शुंभ निशुंभ हे मोठी सेना घेऊन आले. तिने (कौशिकी) घंटानाद केला. ब्रह्मा विष्णु महेश तेथे आले. त्यांच्या शक्ती एकवटल्या मग कौशीकीच्या शरीरातून भयंकर शक्ती प्रगट झाली आणि त्या शक्तीने शुंभ निशुंभ राक्षसांचा नाश केला ही शक्ती म्हणजेच महासरस्वती होय.

**महादुर्गा -**

दुर्गा देवीला हे नाव पडण्याचे कारण तिने दुर्गम राक्षसाचा वध केला आणि विंध्य पर्वतावर अतिशय दुर्गम जागी ती राहिली. ते स्थान पोहोंचण्यास दुर्घट म्हणूनही दुर्गा अशा तऱ्हेची व्युत्पत्ती आढळते. तरी ती एक आदिशक्ती आहे. (ब्रह्मांड पुराण) कारण परत्वे ज्या भक्ताला आदिमायेचे जे नाव प्रिय वाटले त्याने ते तिला बहाल केले.

प्रथम शक्ती आणि मग तिच्या इच्छामात्रे सारी विश्वरचना झाली. हे मत शाक्त पंथात निर्दिष्ट करण्यात आलेले आहे. देवी हीच पराप्रकृति आहे. सनातन पुरुषाच्या संसर्गाने तिने अखिल सृष्टी निर्माण केली. सृष्टीच्या पूर्वीही तिचे अस्तित्व असल्याने आदिशक्ती होय. तिच्यामुळे सकल जीवाची उत्पत्ती होते व तिच्यातच सारे काही लयही पावते. देवीचे रुप म्हणजे साक्षात् परब्रह्माने मातेच्या स्वरूपात स्वतःचा केलेला आविष्कार होय असे शाक्त पंथी म्हणतात.

जगन्मातेची तीन रूपे आहेत. पहिले परारूप - जे कोणालाही गोचर होत नाही. दुसरे रूप - सूक्ष्मरूप जे मंत्रात्मक आहे. तिसरे स्थूल रूप - जे अमूर्तावर ठरत नाही.

ही रूपे स्त्रीपुरुष असून दोनही स्वरूपात आहेत. परंतु बहुधा स्त्रीरूपाचेच ध्यान केले जाते. ती आदिमाया सौंदर्याचे अविकृत निदान आहे. ती चंद्रसूर्यांनी मंडित आहे. तिच्या मुख मंडलावर चमकणारे ते मत्स्य स्वरूप नेत्र कधी प्रकाशाने उजळतात तर कधी तमांध:काराने मिटून जातात. नाम रूपात्मक वस्तूंच्या दृश्याने ते उघडतात. नामरूपे अव्यक्तात विलीन झाल्यावर ते कायमचे मिटतात. उत्पत्ती व लय हा असा खेळ तिचा चालू असतो.

**आपल्या देवता शस्त्रधारी -**

सामान्यत: प्रत्येक देवतेच्या हातात कोणते ना कोणते शस्त्र असते. विष्णु-सुदर्शनचक्र, परशुराम-परशु, श्रीराम-धनुष्यबाण, तसेच अंबा, दुर्गा, भवानी इत्यादी देवतांच्या हातात अनेक आयुधे आहेत. हे आर्य देवतांचे वैशिष्ट्य मानावे लागेल. याना दैत्याशी युद्ध करून सामाजिकता प्रस्थापित करावयाची होती. धर्म, देश, समाज यांच्या रक्षणासाठी प्रत्येकाने शस्त्रधारी झाले पाहिजे आणि मनात सदैव विजगिषु वृत्ती जोपासली पाहिजे.

मातृरूप देवतांची भारतात जी पूजा होत आहे त्या देवतांची उत्पत्ती मानवाप्रमाणे झालेली नाही. आदिशक्ती भक्तांच्या संकटकाळी ती निवारणार्थ एखादी देवी उत्पन्न करते. महिषासुर वधाच्या वेळी महाकाली उत्पन्न झाली. पार्वतीचा मूळचे वर्ण शामवर्ण होता. देवानी तिची प्रार्थना केल्यावर तिची दोन रूपे झाली कौशिकी - गौरवर्णी व कालिका शामवर्णी. ब्रह्मतेजापासून कात्यायनी, मनसादेवी यांचा जन्म झाला. महिषासुर मर्दिनी, अष्टभुजा देवी, दुर्गा या अनेक देवतांच्या तेजाने उत्पन्न झाल्या.

**सप्तशती कथा - (संक्षिप्त)**

सुरथ नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या प्रधानाने त्याला पदभ्रष्ट केले. त्याची सर्व संपत्ती हरण केली. तो अरण्यात भटकत मेधा ऋषीच्या आश्रमात आला. तेथेच समाधी नाम वैश्यपण आला. त्याला त्याच्या बायका मुलानी घराबाहेर काढले होते. उभयतानी ऋषींना दु:खद वृत्तांत निवेदन केले. ऋषीनी त्या उभयताना सांगितले तुम्ही जगन्मातेची मृण्मय (मातीची) मूर्ती तयार करून तिची सर्व भावे आराधना करा. त्या उभयतानी एकाग्र चित्ताने कठोर तपश्चर्या केली. त्यांना जगन्माता प्रसन्न झाली. ही कथा सप्तशतीत आलेली आहे.

**नवरात्र उत्सव व दुर्गा देवी -**

दुर्गादेवीच्या स्वरूपाची महिषासुरमर्दिनीची आराधना अनन्य भावाने भारतात फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. देवी भागवतात या देवीच्या पूजेचा उल्लेख आहे. ती पूजा पूर्वी चैत्र, आषाढ, आश्विन व माघ या चार महिन्यातील शुक्ल प्रतिपदेपासून नवमीपर्यंत होत असे. कालांतराने चैत्र व आश्विन या दोनच महिन्यात नवरात्र महोत्सव करण्यात येत आहे.

चैत्रात पार्वतीच्या जन्मदिनानिमित्ताने हा नवरात्र उत्सव होत असे. पुढे विजयादशमीला रामाने रावणाचा वध केल्याने त्याच्या स्मरणार्थ आश्विन महिन्यात नवरात्रोत्सव सुरू झाला. चैत्रात आजही हळदीकुंकु इत्यादी कार्यक्रम साजरे होतात. हा कार्यक्रम अक्षय्य तृतीयेपर्यंत चालतो. राजस्थानात चैत्र गौरीच्या पूजेला गणगौर म्हणतात. त्यावेळी प्रेक्षणीय मिरवणूक काढतात व गौर जलाशयात वाजत गाजत विसर्जित करतात. बिहारात चैत्र गौरीपूजा देवालयातच करतात. तिथे कलशाची पूजा केली जाते. दक्षिणेत बंगळूर शहरी हा उत्सव होतो. केंपेगौडा (१५३७) याने धर्म राजाचे मंदिर उभे करून हा उत्सव सुरू केला. हा उत्सव फार भव्य व मोठ्या प्रमाणात साजरा होतो.

**शारदीय उत्सव -**

देवीच्या शरद् ऋतूतील उत्सवाची माहिती कालिका पुराणात विस्तृत स्वरूपात आलेली आहे. यात

१३ अध्याय असून ९०० श्लोक आहेत. हीच शिवा, पार्वती, गिरिजा, काली, अंबिका, महाकाली, महामाया, कामाख्या, पार्वती, त्रिपुरा इत्यादी रूपाने भूतलावर अवतरली आहे.

या नवरात्रात महाअष्टमी व नवमी या दिवशी यथाविधी पूजन झाल्यावर दहाव्या दिवशी देवीचे विसर्जन होई. या उत्सवाला शारदोत्सव हे नाव आहे. शारदीय नवरात्र हे शाक्त पंथीय मानले जाते. इतर पंथीय देखील हे नवरात्र उत्साहाने साजरे करतात. शरद् ऋतूच्या प्रारंभी हा उत्सव येत असल्याने याला शारदीय उत्सव म्हणतात. धरणीमाता धनधान्याने समृद्ध झालेली असते. हवा पाणी उत्तम असते. एकंदरीत नैसर्गिक वातावरण प्रसन्न असते.

या नवरात्राच्या आरंभ आश्विन शुद्ध प्रतिपदा या दिवशी सकाळी विधियुक्त घटस्थापना करून केला जातो. याला रोज एक माळ चढविली जाते. अखंड नंदादीप तेवत ठेवला जातो. देवीजवळ या काळात सप्तशती, दुर्गापाठ अगर देवी भागवत आदि ग्रंथांचे पठण केले जाते. नऊ दिवस संपूर्ण उपोषण अगर एकभुक्त राहून हे व्रत करतात. शेवटच्या दिवशी होम हवन, बळी समर्पण, इष्टमित्रांसह भोजन यांनी या व्रताची सांगता करतात. आश्विन शुक्ल अष्टमीला महातिथी म्हणतात. या दिवशी देवीपुढे काही लोकात घागरी फुंकण्याचा कार्यक्रम होतो. त्यांच्यापैकी काहींच्या देवी अंगात प्रवेश करते. त्यावेळी तिची पूजा अनेक सुवासिनींकडून केली जाते. भारतात सर्वत्र हा उत्सव आपआपल्या कुलाचाराप्रमाणे कमी अधिक स्वरूपात साजरा केला जातो.

तामसी व क्रुर वृत्तीच्या दुर्जनांचे प्राबल्य जेव्हा भूतलावर वाढते तेव्हा त्या दुर्जनापासून साधु सज्जनांचे रक्षण करण्यासाठी देवी अवतार धारण करते. असे मार्कंडेय पुराणात म्हटले आहे. नऊ दिवस पूजा करून तिची प्रार्थना केली जाते. ती प्रसन्न होऊन म्हणते. मी तुमच्या रक्षणासाठी सदैव सिद्ध आहे. संकटकाळी मला अनन्यभावाने शरण येताच मी तत्काळ प्रगट होऊन तुमचे दु:ख निराकरण करीन. माझ्यावर संपूर्ण निष्ठा ठेवून जे वागतील त्यांच्या सुखाची मी सदैव काळजी घेईन.

विजयादशमीचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर सर्वत्र साजरा केला जातो. या दिवशी शमी वृक्षाची पूजा केली जाते. शमीची पाने आपआपसात प्रेमाने वाटतात. या बद्दल एक हृद्य कथा आहे. कौत्स नावाचा वरतंतु ऋषीच्या शिष्य अध्यन समाप्तीनंतर गुरूला विनवतो आपण काही गुरुदक्षिणा घ्यावी. गुरूने त्याला सांगितले मी तुला चौदा विद्या शिकविल्या आहेत. तितके कोटी सुवर्ण मुद्रा अर्पण कर. तो रघुराजाकडे आला त्यावेळी सर्वस्व दान यज्ञ करून तो दीन (कंगाल) झाला होता हे पाहून कौत्स तेथून निघणार हे पाहताच राजा म्हणाला एक रात्र थांब मी तुझी सोय करतो. त्याने रातोरात कुबेराला सांगितले, तू सुवर्णमुद्रांचा वर्षाव कर अन्यथा मी तुझ्यावर स्वारी करीन. कुबेराने शमी वृक्षावर सुवर्ण वर्षाव केला. शिष्यासह राजा सकाळी तेथे आला व त्याला सांगितले हे सर्व धन तू घेऊन जा. शिष्य म्हणाला मला फक्त चौदा कोटी मुद्राच हव्यात. रघु राजाने राहिलेल्या मुद्रा लोकांना लुटावयास सांगितल्या. तेव्हापासून सोने लुटण्याची प्रथा पडलेली आहे. हा समारंभ कर्नाटक राज्यात म्हैसूर शहरी फार थाटात साजरा केला जातो.



वऱ्हाडात बाबूंच्या टोपलीच्या तोंडावर देवीचा मुखवटा मांडतात. त्या मूर्तीला फुलांच्या माळानी सजवून पूजन करतात. ती टोपली पाण्याच्या तांब्यावर ठेवतात. नऊ दिवस अखंड नंदादीप तेवत

असतो. दशमीच्या दिवशी तिथे एका कुमारिकेला बसवून तिचेही पूजन करतात. आठव्या दिवशी बळी अर्पण केला जातो.

बंगाल प्रांतात हा सण शेवटच्या चार दिवस कालीपूजा या स्वरूपात फार मोठ्या प्रमाणात संपूर्ण बंगालभर मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. दुर्गा, काली, महालक्ष्मी, महासरस्वती, गणेश आदी मूर्तींचे पूजन केले जाते. बंगालचे लोक कुठेही असले तरी हा उत्सव त्या त्या ठिकाणी उत्साहाने साजरा करतात.



गुजराथ प्रांतातही हा उत्सव मोठ्या भव्य प्रमाणात साजरा केला जातो. या नऊ दिवसात रोज रात्री देवीच्या भोवती फेर धरून स्त्री व पुरुष अत्यंत आनंदाने नृत्य करतात. देवीची गाणी गातात. ही एक देवीची उपासना या रीतीने नृत्य, फेर धरणे, गाणी म्हणणे केले जाते.

काही ठिकाणी रामलीला कार्यक्रमाची योजना केली जाते. दहाव्या दिवशी रावणाची कृत्रिम प्रतिमा जाळली जाते. अशा प्रकारे संपूर्ण भारतात कोणत्याना कोणत्या प्रकारे जगन्मातेची आराधना या शारदीय नवरात्रात केली जाते.

देवीची उपासना म्हणजे शक्तीची उपासना. बलाची उपासना. हे ओळखून आपल्या ऋषीमुनींनी या प्रकारच्या उत्सवाची योजना केलेली आहे. व्रताने मानसिक सामर्थ्य वाढीला लागते. ताकदीला नैतिक सामर्थ्याची जोड दिली असता ती फलदायी ठरते. दुर्बलांच्या संस्कृतीला, नीति विचाराला कोणी विचारीत नाहीत. त्या मागे शक्तीचे सामर्थ्यांचे अधिष्ठान पाहिजे याची सतत आठवण राहावी यासाठी वारंवार अशा सामाजिक उत्सवांची नितांत आवश्यकता असते. हे ओळखून या शक्ती पूजनात आपल्याकडून उपेक्षा केली जाणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. जो स्वत:हून प्रयत्न करतो त्यालाच देवाचे पण सहाय्य प्राप्त होते. देवो दुर्बल घातक: । दुर्बल राहणे महापाप आहे. देश, धर्म, समाज रक्षणासाठी आपण सर्व आयुधानिशी समर्थपणे उभे राहिले पाहिजे हीच गोष्ट आपल्या देवनाराधनेतून आपण शिकले पाहिजे.

समर्थ रामदास आईभवानीला साकडे घालतात - हे माते तू अनेक गोष्टी घडविणारी आहेस असे आम्ही ऐकत आलो आहोत. आम्हाला तुझी रोकडी प्रचीती हवी.

तुझा तू वाढवी राजा । स्वय आम्हाची देखता ।

आईने इच्छा पूर्ण केली. हिंदवी स्वराज्य संस्थापक प्रभू शिवराय या महाराष्ट्रात अवतरले.

निश्चयाचा महामेरू । सकल जनांचा आधारू ।

असे उत्तुंग व्यक्तिमत्व उदयाला आले. शिव प्रभू भवानी मातेचे नि:सीम उपासक होते. तिचा कौल ते नेहमी घेत असत व तिचे कार्य फत्ते करण्यासाठी मोठ्या हिरीरीने शत्रूवर तुटून पडत. अशी ही शक्तीदेवता आहे.

नवरात्र उत्सव म्हणजे शक्तीची आराधना व उपासना होय.

शं. वा. मठ
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

# ग्रंथविश्व

## ज्ञानसागरातील शिंपले (भाग १ ते ५)

आपल्या सामाजिक जीवनात गेल्या काही वर्षांपासून सामान्य ज्ञानाला फार महत्त्व आलेले आहे. जीवनाच्या व ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात सर्व जगामध्ये सतत वाद होत असते आणि सतत संशोधन मोठ्या प्रमाणावर चालू असते. आजच्या सुशिक्षित आणि साक्षर नागरिकाला दोन प्रकारच्या ज्ञानाची जरुरी आहे. त्याच्या स्वत:च्या कार्यक्षेत्रातील ज्ञान अगदी अद्यावत असे पाहिजे. परंतु त्याचबरोबर ज्ञानाच्या व जीवनाच्या इतर क्षेत्रातील महत्वाचे व सुलभ ज्ञानही त्याच्याजवळ अवश्य हवेच.

ताजी नियतकालिके नियमितपणे वाचणाऱ्या नागरिकाजवळ सामान्य ज्ञानाचा पुष्कळच संग्रह असतो आणि हल्ली सर्व नियतकालिकांतून विविध विषयांवरील माहितीचा स्फोटच होत असतो. परंतु आजकाल ह्या नियतकालिकांची संख्या इतकी झाली आहे की, वेळेच्या आणि पैशाच्या दृष्टीने ती सर्व वाचणे किंवा निदान चाळणे अनेकांना शक्य होत नाही. म्हणून निवडक मनोरंजक आणि संग्राह्य अशा ज्ञानग्रंथांची अत्यंत आवश्यकता आहे. ही गरज ४० वर्षापूर्वीच गोविंद सीताराम गोखले (१, धरती सोसायटी, प्रभात पथ, गल्ली नं. १०, पुणे - ४११००४) यांनी ओळखली व 'ज्ञानसागरातील शिंपले'ची निर्मिती केली.

### ज्ञानसागरातील शिंपले

या पुस्तकाचे संपादन करून गोखले यांनी सामान्यज्ञानाच्या वाङ्‌मयात उपयुक्त भर टाकली. शरीरशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, पदार्थविज्ञान, अध्यात्म, करमणूक, विज्ञानशास्त्र विनोद, सुविचार इ. इ. अनेक विषयांची मौलिक आणि मनोरंजक माहिती त्यांनी या पाचही भागांतून दिलेली आहे. त्यांच्या या सर्वस्वी वेगळ्या तऱ्हेच्या संकलनाचे वाचकांनी भरघोस कौतुक केलेच पण महाराष्ट्र शासनानेही या पुस्तकास पारितोषिक देऊन गौरव केला. या सर्व भागास वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभल्यामुळे प्रत्येक भागाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. सुरवातीच्या काही आवृत्त्या एका प्रकाशन संस्थेने काढल्यानंतर नंतरच्या सर्व आवृत्त्या सुधाताई गोगटे यांच्या नितीन प्रकाशनाने (१६४६, टिळक रोड, टिळक स्मारक मंदिराजवळ, पुणे - ४११०३०; दूरध्वनी - ४३३८५७८) काढल्या आहेत. प्रत्येक भागाची पृष्ठे दोनशे ते दोनशे चाळीसपर्यंत असूनही किंमत प्रत्येकी अवघी रु. ५०/- आहे.

खरं म्हणजे ज्ञानाची परिसीमा इतकी अगाध आहे की असले शेकडो भाग लिहून प्रसिद्ध झाले तरी जगातील ज्ञान त्यात कधीच सामावले जाणार नाही आणि अनंत जन्म घेतले तरी सर्व विषयांचे ज्ञान मनुष्याला कधीच होऊ शकणार नाही. आपलं ज्ञान हे तसं पाहिलं तर सापेक्ष असते. दुसऱ्याच्या ज्ञानाशी तुलना करताना आपले ज्ञान कमी जास्त असू शकेल परंतु एखाद्या विषयाच्या संपूर्ण ज्ञानाच्या दृष्टीने बघितल्यास आपले 'सखोल' वाटणारे ज्ञान अगदीच 'उथळ' असण्याचा संभव असतो. जगात शेरास सव्वाशेर असतातच म्हणून ज्ञानाविषयी अहंकार अथवा अभिमान बाळगणे म्हणजे फुगलेल्या बेडकाने आपल्या बांधवांना 'मी हत्तीएवढा झालो' असं सांगण्यासारखं आहे. मनुष्याच्या ज्ञानाच्या व मनोरंजनाच्या कल्पना ज्याप्रमाणे वयोमानानुसार बदलत जातात, त्याचप्रमाणे काळानुसारही त्यामध्ये फेरबदल होत असतो. पंचवीस वर्षांपूर्वी जे ज्ञान उपयुक्त वाटत असे ते आता तितकेसे वाटणारही नाही किंवा जे करमणुकीचे विषय माणसाला पूर्वी आनंदित करीत ते आता करणारही नाहीत त्यामुळे आता ज्ञान हे वेगळ्या पद्धतीने सांगण्याची आवश्यकता वाटू लागली आहे, तसेच

मनोरंजनाचे विषयही बदलत गेल्याने नवीन दृष्टिकोनातून मनुष्याचे मन व उल्हसित करण्याची जरुरी भासू लागली आहे. ही गरज श्री. गोखले यांनी पूर्णांशाने भागविलेली आहे.

तिसऱ्या भागाच्या चौथ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत गोखले म्हणतात, 'खरं ज्ञान अत्यंत शुद्ध व पवित्र आहे. कोणी त्यात कुबुद्धीचा हिणकसपणा घालून आपल्या स्वार्थाकरिता उपयोग करीत असतीलही पण त्यामुळे ज्ञानाच्या पावित्र्याला कलंक न लागता त्या दुर्बुद्ध माणसालाच डाग लागण्याचा संभव असतो.' श्री गोखले यांचे हे विचार मौलिक आहेत आणि त्यांनी अत्यंत परिश्रम घेऊन केलेले संकलनही श्रेष्ठ दर्जाचे आहे आणि म्हणून तिसऱ्या भागाच्या प्रस्तावनेत पद्मश्री कै. प्रा. अनंत काणेकर यांनी त्यांचा सार्थ गौरव करून अशी सर्वोपयोगी पुस्तके प्रसिद्ध केल्याबद्दल लेखक व प्रकाशकाचे अभिनंदन केले आहे तर चौथ्या भागाला प्रस्तावना लिहितांना सुप्रसिद्ध साहित्यिक भा. द. खेर म्हणतात, 'पुराणातल्या सागररत्नांप्रमाणेच इथेही ज्ञानरत्नांचा खजिना पहावयाला मिळाला आणि हे ज्ञानसागरातील शिंपले नव्हे ते मोती आहेत.'

### अपूर्व संग्रह -

ह्या सर्व भागातील कोणतेही पान काढून तुम्ही वाचा 'मौज-माहिती-मनोरंजन'चा ज्ञानसागरच तुम्हाला सापडेल. किती वाचू आणि किती पारायणं करू असे तुम्हाला होऊन जाईल! आबालवृद्धांना मोहिनी घालणाऱ्या या मोरपंखी ज्ञानभांडाराचे कौतुक करावे तेवढे थोडेच! प्रत्येकाने हे भाग वाचावेत - संग्रही ठेवावेत व शुभप्रसंगी इतरांना भेटीदाखल द्यावेत. भाग २ मधील पृ. १९३ वरील 'पुण्यातील निरनिराळ्या पेठा कशा वसल्या?' ह्या शीर्षकाखाली दिलेली माहिती इथे उद्धृत करण्याचा मोह आवरता येत नाही.

### पुण्यातील निरनिराळ्या पेठा कशा वसल्या?

इतिहासातील पुण्याच्या नावाचा पहिला उल्लेख इ. स. ७५८चा राष्ट्रकूटांच्या ताम्रपटावर पूर्नक (पुण्यक) असे नाव आढळते. त्यानंतर यादव, मोंगल, बहामनी, निजामशहा यांच्या अमलाखालून पुणे शहर शहाजीराजांकडे सोपविण्यात आले. त्यावेळी पुण्याचा विस्तार फक्त कसबा पेठेपर्यंतच होता नंतर शिवाजी महाराजांच्या वेळेस तो शनिवार, रविवार, सोमवार पेठेपर्यंत पसरला. कसब्याचे गणपती मंदिर राजमाता जिजाबाईंनी बांधले. इ. स. १६५३ मध्ये शाहिस्तेखानने मंगळवार पेठ वसवली. औरंजेबाच्या स्वारीनंतर बुधवार पेठ फैलावली. पेशव्यांच्या शेतीच्या पडीक जागेत वसाहत करण्याची आज्ञा १७४८-४९ साली बाजीरावाने दिली, तीच शुक्रवार पेठ. १७३० साली पेशव्यांनी शनिवार वाडा बांधायला सुरुवात केली. १७५०-५१ मध्ये गुरुवार पेठेची मांडणी झाली. पानिपतच्या लढाईत धारातीर्थी पतन पावलेल्या सदाशिवराव भाऊंच्या स्मरणार्थ थोरल्या माधवराव पेशव्यांनी 'सदाशिव पेठ' वसवली. रास्तेवाडा १७७८ साली बांधला व १७८९ साली नाना पेठ व गणेश पेठ वसल्या गेल्या. १८५८ मध्ये कँन्टोनमेंट वसले.

डॉ. ग. श्री. खैरांसारख्या महान शिक्षणतज्ज्ञाने पहिल्या भागास प्रस्तावना लिहिली आणि महाराष्ट्राला 'ज्ञानसागरांतील शिंपले'च्या रूपाने सोने प्राप्त झाले. प्रत्येक कुटुंबाने आणि प्रत्येक शाळेने ह्या सर्व भागांचा संग्रह करावा श्री. गोखले व प्रकाशिका सुधाताई गोगटे यांचे पुनश्च एकदा अभिनंदन.

### 'इस्राएल : छळातून बळाकडे'
### - एक अपूर्व ग्रंथ

कै. नारायण हरी पालकर यांचे अत्यंत गाजलेले हे पुस्तक प्रथम १९६६ मध्ये प्रसिद्ध झाले. (माघ शु. ४ शके १८८८) १९७२, १९९७ व २००२ मध्ये अनुक्रमे दुसरी,

तिसरी व चवथी आवृत्ती प्रसिद्ध झाली. या चवथ्या आवृत्तीची पृष्ठे आहेत. २३८ व मूल्य आहे अवघे रु. १५०/- (प्रकाशक क्रॉस रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई - ४०० ०५७. दूरध्वनी :- ९५२२-२६१४४९३२)

आज जगातील ज्यू वा यहुदी म्हणून ओळखण्यात येणाऱ्या एका चिवट, बुद्धिमान नि अठराशे वर्षांनंतर १९७० च्या सुमारास पुन्हा स्वतंत्र झालेल्या लहानशा एकजीव समाजाचा म्हणजेच इस्रायल या राष्ट्राच्या पुनरुत्थानाचा इतिहास या पुस्तकात रेखाटलेला आहे. त्यामध्ये त्यांच्या प्रचंड उद्योगांचे राजकीय उलाढालींचे नि पराक्रमाचे वास्तव चित्रण आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी आजवर अनेक परतंत्र नि दुबळ्या समाजांना विपरित परिस्थितीने घेरलेले असताना आपल्या लोकांना जागृत नि सुसंघटित करून अद्‌भूत संघर्ष करावे लागले आहेत. परंतु इस्रायलची पार्श्वभूमी व स्वरूप हे बरेच भिन्न आहेत. त्यांना आपल्या मातृभूमीचाच निरुपायाने त्याग करावा लागत होता. देशातल्या देशात परतंत्र झाल्यावर जेत्यांविरुद्ध उठाव करणे अत्यंत अवघड असते. असमान धैर्य, उद्योग प्रवणता, राष्ट्रीय दृष्टी यांच्या जोरावर इस्रायलने अपूर्व असे कर्तृत्व दाखविले. त्यांच्या या यशोगाथेचे साऱ्या जगाला विशेषत: भारतीयांच्या निदर्शनास यावे या प्रधान हेतूने त्यांनी हा ग्रंथ लिहिला आहे.

**अपार कष्ट -**

हा ग्रंथ साकार करण्यासाठी पालकरांनी अपार कष्ट घेतले. अनेक ग्रंथ, पुस्तिका नि नियतकालिके यांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांची भाषा अत्यंत सुबोध आहे. आपल्या या ग्रंथाच्या सिद्धतेसाठी त्यांनी अनेक इंग्रजी ग्रंथांचे वाचन केले. पण त्यांच्या बालबोध भाषेवर इंग्रजीचे परिणाम झाल्याचे आढळत नाही. स्वा. सावरकर यांच्या लेखनावर त्यांची विशेष भक्ती होती. त्यांच्या लेखणीचे पालकरांच्या लेखणीवर संस्कार घडले. ह्या ग्रंथलेखनामागे त्यांचा उद्देश होता तो समाज प्रबोधनाचा. या ग्रंथाचा समारोप करताना ते म्हणतात, 'उत्कृष्ट देशभक्तीने प्रेरित होऊन उठणे नि आपल्या समाजातील सर्व कर्त्या लोकांना उठविणे हेच आपले जीवित कार्य झाले पाहिजे. त्यासाठी समाजाच्या घरांची नि मनांची दारे ठोठावण्यासाठी अनेकांनी बद्धपरिकर होण्याची आवश्यकता आहे. जेव्हा आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून जागृत होऊन हा विशाल भारत पराक्रमासाठी उभा राहील तेव्हा जगातील इस्राएलसारख्या छोट्या राष्ट्रांच्या करुणकथा भविष्यकालात ऐकाव्याच लागणार नाहीत. जगातील साऱ्या पददलितांना नि दु:खितांना आधार देण्यासाठी भारताने प्रबल होऊन उठावे, हीच तर आजच्या काळाची एकमेव अपेक्षा आहे.'

**ग्रंथाची १८ प्रकरणे -**

'दुधामधाचा देश', 'मोझेसचे जीवनकार्य' ते 'कर्तृत्वाची भरारी' आणि 'उपसंहार' इ. १८ प्रकरणातून हा सारा रोमहर्षक इतिहास त्यांनी मांडला. उपसंहार प्रकरणाच्या सुरवातीस त्यांनी मांडलेले विचार चिंतनीय आहेत. ते म्हणतात, 'ज्यू लोकांचा आद्यपुरुष आब्राहम यांच्यापासून तो आधुनिक इस्राएलचा राष्ट्राध्यक्ष डॉ. हाइम् वाइजमन पर्यंतच्या ४००० वर्षांच्या प्रदीर्घ परंपरेची कथा आतापर्यंत सांगून झाली. ती कथा रक्त आणि अश्रू यांनी थबथबलेली आहे. त्यातही बरेचसे रक्त सांडले आहे. अन्यायाने - अज्ञानाने नि अश्रूंतही आनंदाश्रूंपेक्षा दु:खाश्रूंचेच प्रमाण कितीतरी अधिक आहे. मनुष्याने स्वत:ला सुधारला असल्याचे सुखेनैव म्हणावे पण ही कथा ज्या रक्ताने नि आसवांनी भिजलेली आहे. त्यातील प्रत्येक थेंब न थेंब कंठरवाने ओरडून सांगत आहे, 'तू वाटेल ते म्हण; पण माणसा, तुझ्यातील पशुभाव अजून प्रभावी आहे. अपसमज, वर्णद्वेष, धर्मद्वेष, श्रेष्ठत्वाच्या अवास्तव कल्पना यांच्या आधारावर नंगानाच घालण्याइतकी ती पशुता तुझ्या भावभावनांत मुरून नि एकजीव होऊन बसली आहे!'

प्रत्येकाने वाचावा असावा हा अपूर्व ग्रंथ आहे.

## गुरु नानक देवांचे पसायदान ॥ जपुजी साहेब ॥

हा 'गुरुमुखी' भाषेतील अप्रतिम ग्रंथ आहे. साऱ्या शीख धर्मीयांना तो शिरोधार्य आहे. त्यामध्ये नानकजींची १४७ पदे आहेत. 'सगळे संकल्प आणि विकल्प सोडून आपले विचार, शब्द आणि कृती ईश्वराला समर्पित करा. मुखामध्ये 'नाम', मनामध्ये राम आणि हातामध्ये काम हा भक्तियोग गुरु नानकांनी सांगितला आहे. कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीयता या स्वभाव दोषापासून मानवजात मुक्त व्हावी. एका परमतत्वाच्या छत्राखाली मानवतेचे राज्य प्रस्थापित व्हावे ही या अवतारी पुरुषाची आकांक्षा होती.

या ग्रंथांच्या अगदी आरंभी आढळणारे ३८ कडव्यांचे जे उत्कट ईश्वरचिंतन आहे ते 'जपजी' या नावाने ओळखले जाते. जपजीचे वाचन मोठ्या श्रद्धेने घरोघर केले जाते. मराठी भाषिकांना ह्या नानक गीतेचे भांडार उपलब्ध व्हावे म्हणून डॉ. (सौ.) कमलजीत कौर बतरा (वावुजी प्रकाशन, डॉ. बतरा हॉस्पिटल, कचेरी रोड, दशमेरा नगर, श्रीरामपूर - ४१३७०९, दूरध्वनी - ०२४२२-२३००९) यांनी त्याचे गद्य रूपांतर प्रस्तुत पुस्तकात ('जपुजी साहेब - पृ. ८४, मूल्य रु. ७५/-, प. आ. १४-४-२००३) दिले आहे. या पुस्तकाला प्रा. शिवाजीराव भोसले यांची प्रस्तावना आहे. ते म्हणतात. 'ज्ञानेश्वरीच्या शेवटी व ग्रंथसाहेबाच्या आरंभी प्रकट होणारे हे पसायदान ही विश्वधर्माचा जाग आहे. मराठी भाषेने आम्हाला भरपूर प्रेम दिले आहे. समृद्ध कले आहे. या प्रेमाचे प्रतीक म्हणून हा अनमोल खजिना मराठी भाषेला अर्पण करीत आहे, असे लेखिका म्हणते.' प्रत्येकाने हे पुस्तक वाचावे.

## संख्यावाचक कोश -माहितीपूर्ण व मनोरंजक कोश

पहिला ज्ञानकोश १९२८ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर अनेक प्रकारचे शब्दकोश, ज्ञानशाखांवरचे विविध प्रकारचे कोश निर्माण झाले. प्रस्तुतचा कोश आहे पटशास्त्रातील दुर्बोध शब्दांचा 'संख्यावाचक कोश' लेखक आहेत रखमाजी देवाजी. प्रकाशक आहेत मो. द. नांदूरकर, अनमोल प्रकाशन, ६८३ बुधवार पेठ, पुणे - ४११००२. (पृष्ठे पॉकेटसाईजची ३२४ मूल्य रु. ४०/-)

आपल्या भारतात अनेक महान विद्वानांनी प्राकृती भाषेत कवितावद्ध हजारो ग्रंथ लिहिलेले आहेत. ते वाचताना त्यात कित्येक वाक्ये अशी आहेत की त्यात संख्यावाचक शब्द मात्र असतात; परंतु त्या शब्दांचा अर्थ ज्ञानी लोकांखेरीज इतर कोणाला मुळीच समजत नाहीत. म्हणून या कोशाच्या संपादकाने सर्व सामान्य वाचकांना त्यांचे अर्थ समजावेत म्हणून या कोशाची रचना केली आहे. सतत दहा वर्ष अनेक महान साधूंचे ग्रंथ, पुराणे, शास्त्रे वगैरेंच्या अगाध समुद्रातून दुर्बोध शब्दार्थांची रत्ने सापडली. ती या ग्रंथात सादर केली आहेत. (सुरुवातीलाच संपादकाने ज्या ग्रंथांचे सहाय्य घेतले त्यापैकी काही ग्रंथांची नावे अकारविल्हे दिलेली आहे. ती संख्या सुमारे ११० आहे.)

१ ते ११० या आकड्यांच्या संख्येतील विषय या कोशात दिलेले आहेत १०१ कौरवांची नावे, १०६ कीचकांची नावे, १०८ रामायणांची नावे इ. इ. मनोरंजक माहिती यात आहे. काही अंकाचे विषय लेखकाला मिळालेले नाहीत. या ग्रंथाचा 'माहितीपूर्ण व मनोरंजक कोश' असे वर्णन करण्यास हवे. सर्वांनी तो अवश्य संग्रही ठेवावा.

## हिंदू राष्ट्र : एक विचार मंथन

स्वा. सावरकर हे क्रांतिकारकांचे मुकुटमणी. देशासाठी सर्वस्वाचा होम करणारे ते असामान्य व्यक्तिमत्व होते. आपल्या अलौकिक कर्तृत्वाने त्यांनी साऱ्या जगाला दिपवून टाकले. हिंदुत्वाच्या रक्षणासाठी आपले तनमनधन अर्पण करणारा हा विलक्षण प्रतिभेचा नेता होता. त्यांच्या

भगभगत्या भाषणांचा विचारांचा संग्रह या पुस्तकात (हिन्दु राष्ट्र : एक विचारमंथन) प्रमोद पंडीत जोशी (रामछाया, भोर गल्ली, टिळक चौक, कल्याण - ४२१ ३०१; दूरध्वनी - ९५२५ - २२०१९९०) यांनी केलेला आहे. पुस्तक हिंदी भाषेत आहे. (पृष्ठे आं त १६८ मूल्य आहे रु. १००/-) 'आज जगामध्ये ७० ून अधिक देश ख्रिश्चनांचे आहेत. इस्लामी देशांची सं ख्याही ४५हून अधिक आहे. मात्र भारताला हिंदूचा देश म्हटले तर त्यांच्यावर सांप्रदायिकतेचा ठपका ठेवला ज तो त्याचे आश्चर्य वाटते !', असे पुस्तकाच्या संपादनास सहाय्य करणारे श्री. तुलसीदास चौंदना (आगरा) यांनी म्हटले आहे. पुण्याच्या सार्वजनिक सभेचे अध्यक्ष श्री. पु. ग. मोडक यांची प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे. स्वा. सावरकरांचा यथार्थ गौरव करणाऱ्या तीन ओळींच्या एका कवितेचा जी अनेकांना अपरिचित असावी असे वाटते उल्लेख येथे करतो.

विश्वात विख्यात झाले बहादर दोन । जे गेले आईसाठी सागरास पालांडून । हनुमतानंतर आहे या विनायकाचा मान ॥

## 'पु.लं.चे मुक्काम शांतिनिकेतन'

बंगाली भाषा आणि रवीन्द्रनाथ टागोरांचे काव्य यांच्या ओढीने पु.लं. १९७० साली बंगाली भाषा शिकण्यासाठी शांतिनिकेतनात गेले होते. तेथील साऱ्या अनुभवांचे चित्रण त्यांच्या वंगचित्रे या पुस्तकात आहे. १९७७ साली पु.ल.पुनश्च शांतिनिकेतनला गेले. या वास्तव्यात त्यांनी बंगाली भाषा वाङ्मयाचे अध्ययन तर केलेच, पण महत्वाचे म्हणजे दैनंदिनी लिहिली आणि या मुक्कामातील अनुभवांची नोंद केली. प्रस्तुत पुस्तकात (पृ. १६४, मूल्य रु. १२५/-, प्र. आ. १२-६-२००१ ; प्रकाशक संजय वि. भागवत, मौज प्रकाशन गृह, खटाव वाडी, गिरगाव, मुंबई - ४०० ००४) पहिला भाग या अप्रकाशित दैनंदिनीचा आहे. दुसरा भाग 'स्वाध्याय' शीर्षकाचा आहे. बंगाली भाषा शिकणाऱ्यासाठी पु.लं.नी जे प्रयत्न केले त्याची माहिती या भागात आहे तर शांतिनिकेतनमधील अनुभवावर व अभ्यासावर आधारलेले पाच लेख या तिसऱ्या भागात आहेत (हे सारे लेख यापूर्वी 'हंस', 'महाराष्ट्र टाईम्स' 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' 'दीपावली' या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत) सूक्ष्म निरीक्षण, खेळकरपणा आणि विनोदाची पखरण यामुळे पुस्तक वाचनीय झाले आहे. या लेखातील शेवटचा लेख आहे. 'शांतिवन ते दादर' त्यातील एक महत्त्वाचा उतारा देण्याचा मोह आवरता येत नाही तो किस्सा असा -

'मी कंपार्टमेंटच्या दाराच्या कड्याविड्या लावल्या खरे तर माझे सामान चोरणाऱ्याला पश्चात्तापच व्हावा, असलाच ऐवज माझ्यापाशी होता. पुस्तके, दाढीचे सामान, लेंगेझब्बे, पुस्तके, टॉवेल-पुस्तके वहा... म्हणजे चोरांनी मला बदडलेच असते. त्यांचा टाईम वेस्ट केल्याबद्दल...'

'खिडकी उघडी ठेवण्यात अर्थ नव्हता, बाहेर पाऊस चालू झाला होती. कंपार्टमेंटमधील दिवेही 'नियमाप्रमाणे काम' नसल्याप्रमाणे संपावर गेले होते. त्यामुळे वाचन अशक्य. अशावेळी 'झोपून जा' हा कडंक्टर साहेबांचा आदेश पाळण्यापलिकडे काय करणार?

मध्यरात्री 'धाड धाड धाड' अशी कंपार्टमेंटच्या दारावर थाप पडत होता. झोपेतल्या माणसाला प्रथम उठावे लागते. स्वत:ला जरासे सावरावे लागते. दिव्याचे बटण सापडावे लागते मग दिवा लागतो, मग चष्मा शोधावा लागतो. या क्रियांचे भान दारावर धडधडाट करणाऱ्या इसमाला नसावे किंवा त्या दिवसाचा त्याचा तबल्याचा रियाझ झाला नसावा. दारावर अव्याहत आघात होत होते. गाडी थांबलेली होती. कुठलेसे स्टेशन आले होते. मी दारावरचा तो तबला-सोलो तसाच चालू ठेवून प्रथम खिडकी उघडली. म्हणजे चोरवीर आले असले तर फलाटावरच्या लोकांना आमची झटापट दिसून त्यातले चार

धाडसी लोक माझ्या मदतीला आले असते, अशी सगळी जय्यत तयारी करून दार उघडले, 'आय एम सॉरी टु डिस्टर्ब यू सर' म्हणत कंडक्टर साहेब एका सरदारजींना घेऊन आत आले. सरदारजींनीही नींद खराब केल्याबद्दल माझी माफी मागितली. इतक्या भलेपणाचा प्रत्यय आल्यावर आपण तरी 'हैं हैं कसचं कसचं..' ह्या पलीकडे काय बोलणार?...

एक उत्तम पुस्तक सादर केल्याबद्दल श्रीमती सुनीता देशपांडे व प्रकाशक संजय भागवत यांचे अभिनंदन.

## 'संसदीय लोकशाही - १९५२ - २००० : सिंहावलोकन'

- उपयुक्त संदर्भ ग्रंथ

विश्व संवाद केंद्राने (सीता निवास, दसुरा मजला, २१९, डॉ. आंबेडकर रोड, मध्य रेल्वे क्रीडांगणासमोर, परळ, मुंबई - ४०० ०१२; दूरध्वनी : २४१०५४१४) नुकताच एक मौलिक ग्रंथ प्रकाशित केला आहे. (डबल डेमी आकाराची १७८ पाने आहेत व मूल्य रु. ४५०/- आहे.) या पूर्वी हा ग्रंथ इंग्रजी व हिंदीमध्ये प्रसिद्ध झालेला आहे. मराठी आवृत्तीत थोडीफार भर घालून तो वैशिष्ट्य पूर्ण स्वरुपात प्रसिद्ध झालेला आहे.

### जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश

भारतातील संसदीय लोकशाहीने आपला अर्धशतकीय प्रवास पूर्ण केलेला आहे. भारत जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश आहे. भारतात अशिक्षितांची संख्या मोठी असूनही तो अत्यंत प्रभावी असा लोकशाही देश आहे. मतदान पेटीद्वारे भारतीय नागरिकांनी सरकारांमध्ये अनेक बदल घडविले. ही लोकशाही जिवंत व बळकट ठेवण्याचे मोठे कार्य भारतातल्या अशिक्षित जनतेने केले आहे. विपरित परिस्थितीतसुद्धा त्यांनी आपल्या मताधिकाराचा वापर करून हे अजोड काम केले आहे. आमच्या शेजारच्या राष्ट्रांमध्ये लोकशाहीची पडझड होत असतांना सुद्धा आमच्या संसदीय प्रणालीवर काहीच फरक पडला नाही.

याचा अर्थ असा नव्हे की भारतीय लोकशाही परिपूर्ण आहे, उत्तम आहे किंवा त्यांत उणीवा नाहीत. अनेक लोकांनी या संसदीय लोकशाहीबद्दल शंका उपस्थित केलेल्या आहेत तर काही लोकांनी हुकूमशाहीचे सुद्धा समर्थन केले आहे. तथापि ही पद्धत अधिक सशक्त बनणे आवश्यक आहे, ती अधिक प्रभावशाली होणे जरुरीचे आहे. त्यामुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास दृढ होईल. त्यासाठी अशा प्रकारच्या संस्थांबद्दल जनमानसांत अधिक ज्ञान प्राप्त होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने संसदेच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचे महत्त्वाचे काम संसदीय लोकशाहीतील प्रतिष्ठित संसदपटूंनी केलेले आहे. त्याचेच फलित म्हणजे प्रस्तुतचा ग्रंथ होय.

### नामवंतांचे लेखन

या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ('प्रभावी लोकशाहीची आवश्यकता'), जी. एम्. सी.बालयोगी ('संसद कार्यपद्धतीची पुनरावलोकनांची आवश्यकता'), राष्ट्रपती ए.पी. जे. कलाम ('धोरणात्मक निश्चितीसाठी केंद्रीभूत दृष्टिकोनाची आवश्यकता), एम. व्ही. कामत ('दोषी संसद सदस्यांच्या विरोधात कारवाई हवी'), मधू दंडवते (संसदीय परंपरा), के. विठ्ठलराव गाडगीळ ('संसदेतील खाजगी विधायक'), सुभाष सी. कश्यप ('लोकसभेची पन्नास वर्षे'), सोनिया गांधी ('संसद क्रियाशील असावी'), इंद्रकुमार गुजराल ('संसदीय कामकाजाचे महत्त्व'), माधवराव गोडबोले ('लोकसभा बोध आणि प्रश्न'), न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी ('संसद आणि न्यायपालिकाचे महत्त्व') पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी (संसदेची कार्यप्रवणता) इ. ज्येष्ठ श्रेष्ठ ३४ संसदपटूंचे व विचारवंतांचे त्यात अप्रतिम लेख आहेत.

**ग्रंथाची वैशिष्ट्ये -**

२४-९-१९५१ रोजी मुद्गल केस प्रकरणी पं. जवाहरलाल नेहरु यांचे भाषण ('सदस्यांचे आचरण' - पृ. १०३) २४ फेब्रुवारी १९७७ रोजी भारतीय प्रशासनिक सेवेच्या प्रशिक्षार्थींच्यासमोर श्री. पी. ए. संगमा - २३-५-१९९६ ते २३-९-१९९८) जी. एम्. सी. बालयोगी - (१२ मार्च १९९८) ते (२००२ व १०-५-२००२) पासून मनोहरपंत जोशी यांची भाषणे दिलेली आहे.

या ग्रंथामध्ये काही जाणकार मंडळीचे दिलेले महनीय विचार असे -

सरकारे येतील आणि जातील परंतु राष्ट्र तशीच कायम असतात. या देशाची लोकशाही जिवंत राहील. (अटल बिहारी बाजपेयी)

एका लोकशाही राज्यव्यवस्थेत सर्व नागरिक कायद्यासमोर समान असतात. अर्थात एक मौलिक सिद्धान्त आहे मात्र या रुपात ज्यावेळी कायदा लागू करण्याचा प्रश्न येतो त्यावेळी संसद सदस्य हे एका सर्वसामान्य नागरिकापेक्षा वेगळे ठरत नाहीत. (जी. एम्. बनातवाला)

एक वाईट सरकार हा उदासीन मतदारांचा एक अपरिहार्य परिणाम आहे. जोपर्यंत आमच्या देशाचे नागरिक आपल्या जन्मदात्री मातृभूमीकरिता स्वत:ला समर्पित करण्यासाठी कटिबद्ध होत नाहीत तोपर्यंत राजकारणसुद्धा पारदर्शी होणार नाही आणि आमचे आर्थिक भविष्यसुद्धा उज्ज्वल होणार नाही. (एन. ए. पालखीवाला)

लोकांचे प्रतिनिधी आणि यथार्थ नेता होण्याची जर आपली इच्छा असेल तर ती योग्य अपेक्षा आहे. आपण स्वत:च्या अनुभवातून लोकांशी बोलले पाहिजे. उदा. चारित्र्य, सभ्यता, सन्मान, सहिष्णुता आणि सामंजस्य (कृष्णकांत)

या अति उंच हिरव्या पाचूसारख्या इमारतीवर सोन्याची अक्षरे कोरली आहेत. उदार लोकांच्या सत्कर्माव्यतिरिक्त इथे काहीही शिल्लक राहू नये. (संसदेतील शिलालेख)

ज्या ठिकाणी श्रेष्ठ व्यक्तीच नाही ती राज्यसभा कसली? जो धर्मपरायणतेने बोलत नाही तो श्रेष्ठ नसतो. ज्यात सत्य नाही ती धर्मपरायणात कसली? आणि जो एखाद्याला छळ करण्यासाठी प्रवृत्त करतो ते सत्य नाही. (महाभारत)

लोकप्रतिनिधींमध्ये सहनशीलता, सहिष्णुता, शिस्त हे गुण असणे आवश्यक आहे. तरच जनसमूहाला शांत करता येईल आणि त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करता येईल. (करिया मुंडा)

प्रत्येक संसद सदस्य आणि विधीमंडळ सदस्य राष्ट्राचे आदर्श आकांक्षा आणि आस्थांचे संरक्षक आहेत. (के. आर. नारायणन)

याशिवाय 'भारताचे आजवरचे पंतप्रधान' 'लोकसभेतील महिला उमेदवार आणि विजयाची टक्केवारी' 'लोकसभेने मंजूर केलेली आर्थिक विधेयके', 'लोकसभेतील कामकाजातील व्यर्थ वेळ - एक दृष्टिक्षेप' लोकसभेतील एकूण सदस्य व त्यातील महिला सदस्य' इ.ची आकडेवारीही दिलेली आहे.

**उपयुक्त संदर्भ ग्रंथ -**

एकंदरित हा ग्रंथ भारतीय संसदेबद्दल आपुलकी ठेवणाऱ्यांना अत्यंत उपयुक्त संदर्भ ग्रंथ आहे. खासदार, आमदार, नगरपालिकेचे सभासद यांनी त्याचा अभ्यास करावा. एक उत्तम दस्तावेज सादर केल्याबद्दल 'विश्वसंवाद केंद्र संस्था, संपादकीय मंडळ (एम.व्ही. कामत, आर.ए. जहागिरदार, माधवराव गोडबोले) अतिथि संपादक अभय मोकाशी व संपादक लक्ष्मीकांत जोशी यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

**शरद जोशी**
(ग्रंथप्रसारक)

# बऱ्याच वर्षांनी उगवलेले 'श्वेतकमळ'

*श्रीमती आशा भिडे यांनी 'श्वेतकमळ' या काव्यसंग्रहाचे केलेले परिक्षण.*

- संपादक

('श्वेतकमळ' - मराठी काव्यसंग्रह) प्रा. कृष्णा चौधरी, पूर्वा प्रकाशन, रामटेक, जिल्हा - नागपूर, मूल्य - ५० रुपये.)

प्रा. कृष्णा चौधरी या विदर्भातील रामटेकच्या कॉलेजातून मराठी विभागप्रमुख म्हणून निवृत्त झालेल्या प्राध्यापक कवींचा 'श्वेतकमळ' हा दुसरा काव्यसंग्रह. या आधी १९७० मध्ये त्यांचा 'झळई' हा कविवर्य अनिल यांची प्रस्तावना व प्राचार्य या. मु. पाठक यांचे आशिर्वाद लाभलेला काव्यसंग्रह. 'नवकलिका' (प्रातिनिधीक काव्यसंग्रह संपादन) १९६०, 'अग्निकमळ' (राम शेवाळकर व कृष्णा चौधरी संपादित) १९९१ असे दोन काव्यसंग्रहांचे संपादनही यांनी केलेले आहे.

प्रदीर्घ काळानंतरच्या या काव्यसंग्रहाला चौधरींचे गुरु डॉ. प्रा. द. भि. कुलकर्णी यांची प्रस्तावना आहे. यांच्या कविता सत्यकथा, अनुष्टुभ, अभिरुची, प्रतिष्ठान, युगवाणी मधून पूर्वप्रसिद्धी मिळालेल्या आहेत. एकेकाळच्या नवसाहित्याच्या अग्रणी म्हणून गणलेल्या मासिकातून कविता प्रसिद्ध होऊन पहिल्याच संग्रहाला अनिलांची प्रस्तावना लाभूनही हा कवी दुर्लक्षितच राहिला. 'झळई' या त्यांच्या उमेदीच्या काळातल्या काव्यसंग्रहातून दर्शन घडले ते त्यांच्या नैराश्य-अज्ञाताच्या ओढीचे आणि अज्ञाताच्या झळींचे. ही जिव्हारी लागलेली झळ भावनिक असून त्यातून त्यांची कल्पकता, संयम, रेखीव अभिव्यक्ती व आत्मनिष्ठा सुस्पष्ट जाणवते. चौधरींच्या पहिल्या काव्यसंग्रहातील कवितेवर कोणत्याही प्रथितयश कवींच्या काव्याचा प्रभाव पडलेला नाही. याचे कारण बहुधा अनुकरणाच्या मोहात त्यांची कविता सापडली नाही हेच असावे.

तरी पण 'श्वेतकमळ' या दुसऱ्या काव्यसंग्रहातील कवितांवर बा. सी. मर्ढेकर व विंदा करंदीकर यांच्या काव्याचा प्रभाव बऱ्याच प्रमाणात जाणवतो. उदाहरण द्यायचे झाल्यास त्यांची 'मांडव' ही कविता पहा -

आता भैरवाने भोळ्या  
स्वैर करावे तांडव  
पेटव गा, आतातरी  
उभ्या जगाचा मांडव !

या ओळी मर्ढेकरांच्या

असशील भोळ्या कुठे भैरवा,  
उघड तुझे तर तिनही डोळे;  
भस्म करी गा, आता तरी हे  
हे हाडांचे खड सापळे !

या ओळींची सही सही नक्कल वाटते.

'ओढ', 'सोड माझ्या दुःखासह', 'चांदण्यात', 'कहाणी', 'पाखरु', 'आला श्रावण तरीही', 'सांज आली', 'शिरीषाचे फूल' इ. कवितातून चौधरींचीच कविता उस्फूर्तपणे बहरलेली जाणवते.

त्यांची 'शेजार' कविता पहा -

देह झाला देहू । प्राण हा आळंदी  
वैष्णवांची नांदी । सोबतीला ॥  
दिंड्या पताकांचा । खांद्यावरी वरी भार ।  
अखंड शेजार । विठोबाचा ॥

कवीचे जास्त प्रमाणात आयुष्य वरूड, साकोली, रामटेक अशा ग्रामीण भागात गेलेय. त्यामुळे कवीने आपला सांस्कृतिक वारसाही जपलेला अशा कवितेतून जाणवतो.

'श्वेतकमळ'मध्ये कार्ल मार्क्स, डॉ. आंबेडकरांवर कविता आहे. 'झळई'मध्ये केशवसुतांवर. त्यांच्या या कवितांमधून कवीची जीवनमूल्ये, निष्ठा प्रगट होतात.

चौधरींची कविता साधी, सरळ, तरीही कुठेकुठे प्रतिमासृष्टीने नटलेली, गाभुळलेली, झाकोळलेली अशी आहे. तिला शब्दसोस नाही. पण नव्या परिमाणांचा ध्यास आहे. ती केशवसुती वळणाचीही नाही व दलित संप्रदायाचीही नाही. ती अनिल, तांबे, मर्ढेकर, करंदीकर, कुसुमाग्रज यांच्या पठडीतली आहे.

माझा इवलासा देह
तुझी आकाशाची झेप
कटाक्षानेही जळेल
काल लाविलेले रोप

'वळ' या कवितेतील या ओळी तसेच त्यांच्या 'प्रवास' या कवितेतील ओळी

नाही कळत कधीही
इथे दुःखाचे कारण
रुक्ष वाळवंटी चाले
मानवाची वणवण.

किंवा 'देवद्वार' ही संपूर्ण कविताच, विशेषतः या ओळी

'ओंजळीत येईचना
खळ्यातले दाणे
कुंतीचीच व्यथा मागे
माझे वांझ गाणे'

यातून कवीच्या अंतर्मनातील अश्वत्थाम्याची भळभळणारी दुःखाची जखम, तीव्रपणे ठसठसणारी अनामिक संवेदना रसिकांना अस्वस्थ करतात. 'डोंगर' ही कविता त्याचे मूर्तिमंत, जिवंत उदाहरण.

अभिरुचिनिष्ठ काव्येतिहास लिहिला जाईल तेव्हा म. म. देशपांडे, प्रभाकर शिरास, गायधनी, श्रीधर शनवारे या कवींप्रमाणेच कवी कृष्णा चौधरी यांचेही नवमूल्यमापन होईल व त्यांच्या कवितेतील सहजसुंदर प्रतिमासृष्टी, प्रतीतिधर्म, आत्मनिष्ठा रसिकांना जाणवेल असा आशावाद (व आशिर्वादही) डॉ. दर्भिनी व्यक्त केला आहे.

आपल्या मनोगतात कवीने 'श्वेतकमळ' याचा अर्थ स्पष्ट करून सांगितला आहे. अथर्व वेदात मनुष्याच्या हृदयालाच 'श्वेतकमळ' संबोधले आहे. कमळ म्हणजे पिंड ब्रह्मांडाचे प्रतिक. ते विश्वोत्पत्तिशी मिळते जुळते आहे म्हणजे सृजनाशी. बुद्धाचे आसनच कमळ. त्याच्या पावलागणिक कमळे फुलतात. त्यांच्या 'प्रवाद' कवितेत-

इथे तर रोज अश्वसंस्कृतीचा खिंकाळतो आहे घोडा 'धम्मा'च्या पावलांनी कसे उमलायचे ?

'प्रवास'मध्ये म्हणतात -

तू म्हणजे एक अपार्थिव निरागस अच्छेद सरोवरातील 'श्वेतकमळ'.

श्वेतकमळ म्हणजे चंद्रविकासी कमळ. स्त्रीत्व, जीवोत्पात शोभा, शाश्वतजीवन, शुचित्व या अर्थ छटांच्या भाववृत्ती 'श्वेतकमळ'मध्ये रसिकांना जाणवाव्यात. हा कवीचा साफल्याचा आनंद आहे, असे कवीने म्हटले आहे.

'कधितरी' या कवितेत परमात्म्याच्या भेटीची तीव्र आस, तो खरच कधीतरी दाराशी येईल आणि आत्मा परमात्मा मीलनाचा क्षण येताच 'मन जवळ यावया गांगरते' या तांब्यांच्या ओळीप्रमाणे चौधरी म्हणतात -

असा आज अचानक
क्षण मीलनाचा येता

(पान क्र. २० वर)

# फेंगशुई - समतोल, समृद्ध आणि संपन्न जीवनाचे एक प्राचीन शास्त्र

*फेंगशुईबद्दल सर्व सामान्यांच्या मनात एक अनाकलीय कुतुहल असते याबद्दल प्राथमिक माहिती या लेखात आहे. श्री. प्रदीप हळवे बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व फेंगशुईचे अभ्यासक आहेत. - संपादक*

'असावे घरटे आपुले छान' या काव्यपंक्ती मानवी घरट्यांच्या स्वप्नांना अधोरेखित करतात. त्यासाठी आयुष्यात खूप झीज सोसावी लागते. मग कुठे चार दोन क्षण सुखाचे मिळतात. अलिकडे 'फेंगशुई' या शब्दाने मानवी घरट्याला एक वेगळंच परिमाण प्राप्त करून दिलं आहे. ही निव्वळ फॅशन नसून 'फेंगशुई' हे शास्त्र घराच्या भरभराटीचं, समृद्धीचं द्योतक म्हणून सिद्ध होऊ लागलं आहे.

**पाच मुलतत्त्वे -**

फेंगशुईचा सरळ, सोपा अर्थ आहे हवा व पाणी. आजकाल बाजारात सगळीकडे फेंगशुईच्या वस्तूंचा बाजार मांडलेला दिसतो, खरे पाहिले तर फेंगशुईची कोणतीही वस्तू बाजारातून आणण्याची गरज नाही, जर आपण फेंगशुईतील पंचतत्त्वे समजून घेतली तर अग्नी, पृथ्वी, वायू, जल आणि आकाश या पंचमहाभूतापासून यच्चयावत सृष्टी बनली आहे. हा आपला सिद्धांत जगातील अनेक तत्त्वज्ञ मान्य करतात, आता फेंगशुईमध्येही अशीच पंचतत्त्वे सांगितली आहेत, त्याचा वेगवेगळा क्रम, एकमेकांवर होणारा परिणाम, रंग, दिशा, धातु, आकार, प्रकार यांचे मिश्रण अशा अनके माध्यमांतून हा अभ्यास करावा लागतो. वृक्ष (किंवा काष्ठ) जळते त्यातून अग्नि निर्माण होतो. त्यातून राख उरते, जी पृथ्वीरूपच आहे, त्यातून अनेक प्रकारचे धातू मिळतात, ते वितळल्यास पाणी निर्माण होते, जे पुन्हा लाकडाला जन्म देते.

यातील एकाचे प्रमाण कमी झाले की माणसाला अस्थिरता येते, त्याचा शारीरिक समतोल बिघडतो आणि शरीर बिघडले की मन हा समतोल आपल्याला सांभाळावा लागतो म्हणजे जीवनात सुख, आनंद, समाधान, यश, प्रेम, लक्ष्मी सारेच प्राप्त होते.

**तीन प्रकारचे लक -**

फेंगशुई हे लहरींवर तसेच दिशांवर आधारित शास्त्र आहे. सभोवतालच्या वातावरणातील लहरींचा तुमच्यावर परिणाम होत असतो. फेंगशुई हे त्रिनीटी ऑफ लक वर आधारित शास्त्र आहे.

★ **हेवन लक** - हे मनुष्य जन्म घेतो त्यावेळी असणाऱ्या ग्रहांच्या स्थितीवर अवलंबून असते त्याला आपण नशीब म्हणतो. याचा पूर्ण आयुष्यात ४०% भाग असतो.

★ **मॅन लक किंवा कर्म** - काही माणसे अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून अतिशय मेहनत घेऊन यश संपादन करतात. त्याचा आयुष्यात २५% भाग असतो.

★ **अर्थ लक** - म्हणजे जमिनीचे किंवा निसर्गाचे लक हे आपल्या आयुष्यात ३५% सहाय्य करते व फेंगशुई हे 'अर्थ लक' वर आधारित आहे. जमिनीचे लक आपण सहजरित्या बदलू शकतो. म्हणजे काय तर 'getting a right opportunity at right time is a luck' त्यामुळे आपल्याला योग्य संधी योग्य वेळेला मिळाली तर आपण आयुष्यात यशस्वी होतो व अशी संधी प्राप्त करण्याचे विचार, मानसिकता ही फेंगशुई आपल्याला मिळवून देऊ शकते.

जर तुम्हाला तुमच्या घरात किंवा ऑफिसमध्ये काही बदल करावेसे वाटत असतील तर या शास्त्राचा वापर तुम्ही जरूर करावा असे मला वाटते. एक बदल केल्यावर दुसरा असे हळूहळू बदल केल्यामुळे नक्की कशामुळे काय

होते ते आपल्याला कळते, हे वाचायला जरी सोपे वाटत असेल तरी वापरण्यास सोपे नाही, या चिनी वास्तुशास्त्राचा आवाका खूप मोठा असला तरी प्रत्येक शास्त्राला जशी मर्यादा असते तशी यालाही आहे, वशीकरण, शत्रुनाश तंत्र मंत्र व जादुटोणा इ. गोष्टी या शास्त्राच्या कक्षेत येत नाहीत. हे शास्त्र मुख्यत्वेकरून वास्तुशी निगडित असलेले शास्त्र आहे हे प्रथम वाचकांनी ध्यानात घ्यावे, ते वास्तुदोषावर व तदनुषंगिक समस्या सुटण्यासाठी उपाय सुचविते, साहजिकच त्याविषयी अवास्तव अपेक्षा बाळगणे मूर्खपणाचे ठरेल.

फेंगशुईच्या अभ्यासक्रमात फॉर्म स्कूल, बेसिक, कम्पास स्कूल, सिम्बॉलिक फेंगशुई, एट मॅन्शन, कुआ फॉर्म्युला, फ्लाइंग स्टार असे क्रमाक्रमाने शिकत या शास्त्रात मास्टर बनता येते किंवा हे शिकण्यात वेळ किंवा आवड नसल्यास फेंगशुई तज्ज्ञाकडून घराचे कन्सल्टींग केले जाते. यात घरातील व्यक्तींच्या जन्मतारखेवरून कुंडल्या बनविल्या जातात. या कुंडल्यांचा संबंध वास्तूशी असतो, यावरून त्या व्यक्तीच्या चार भाग्यकारक व चार वाईट दिशा येतात. यामध्ये आपल्या वास्तुचा मुख्य दरवाजा, आपल्या स्वयंपाक घरातील शेगडीची दिशा व आपल्या झोपण्याची दिशा यावर संबंध अवलंबून असते. तरी आपले भविष्य, शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्थिती, करियर, नातेवाईक संबंध, सुधरवून वास्तुदोष सहजपणे निवारण करू शकतो, जरी याला विज्ञानाची कसोटी लावता येत नसली तरीसुद्धा फेंगशुईला जगभर मान्यता मिळालेली आहे.

थोडक्यात तुमचे जीवन सुखी होण्यासाठी घराची रचना म्हणजे अंतर्गत सजावट कशी असावी, याचे वस्तुनिष्ठ व अनुभवसिद्ध मार्गदर्शन करणारे 'फेंगशुई' हे चिनी वास्तुशास्त्र आहे.

**प्रदीप प. हळवे**
कळवा, ठाणे.
फोन : २५४४ १२८५

(पान क्र. १८ वरून)

## बऱ्याच वर्षांनी उमललेले 'श्वेतकमळ'

का हे गोंधळते मन
तूच सांग विश्वनाथा

अशा अनेक कवितांवर तांब्यांची व अनेक कवितांवर मर्ढेकरांची छाप आहे.

'झळई' मधून जाणवणारी अज्ञाताची ओढ 'श्वेतकमळ'मध्ये अधिक तीव्र झालेली प्रतित होते. नैराश्याचे गडद झाकोळ, कुठे चिखलाच्या खोल गर्तेत, कधी वावटळी उडणारा पाळा पाचोळा, अज्ञाताचा मार्ग, काळयाकुट्ट ढगांनी अंधारलेला अशा भावछटा 'श्वेतकमळ'मध्ये जाणवतात.

'संध्याकाळ' या प्रतीतिधर्मी कवितेतील शेवटच्या ओळी याची साक्ष देतील.

हे कृपासिंधू!
मला विरघळून टाक ना तुझ्या अजस्र मिठीत

प्रश्न निर्माण होण्या आधीच!

'आण' मधील या ओळी -

अरे पांडुरंगा! तुझे
इथे पाठवी विमान
तुक्याच्या अभंगाची
टाळ गोधडीची आण

चंद्र, किनारा, श्रावण, बळ, नाळ, अंतरा, आयुष्य आयुष्य अशा काही कविता रसिकांना निश्चितच भावतील.

**आशा भिडे**
बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
फोन : २५४१०१४०

# ५ सप्टेंबर-शिक्षक दिन

*गेल्या महिन्यात ५ सप्टेंबरला 'शिक्षक दिन' होता. या दिवसाच्या निमित्ताने एका शिक्षिकेने केलेले हे प्रकट चिंतन.*

*- संपादक*

५ सप्टेंबर डॉ. राधाकृष्णन यांचा वाढदिवस. हा दिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. डॉ. राधाकृष्णन् यांनी ४० वर्षे शिक्षणक्षेत्रात शिक्षक म्हणून फार मोठी कामगिरी केली आहे. ते करीत असताना त्यांनी प्राचीन ऋषीमुनींचीच परंपरा आपल्या आचरणातून प्रकट केली आहे.

भारताची थोरवी, परंपरा संभाळून किंबहुना आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेने त्यात मोलाची भर घालून डॉ. राधाकृष्णन् यानी भारताची गौरवगाथा उज्वलित केली आहे. डॉ. राधाकृष्णन् यांनी भारताच्या कुठल्याही स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला नाही. सत्याग्रह-तुरुंगवास, हद्दपारी भोगली नाही तरी भारताच्या श्रेष्ठ श्रेणीच्या नेत्यांत त्यांची आदरपूर्वक गणना केली जाते. कारण प्रत्यक्ष राजकारणापासून, सत्तास्थानापासून अलिप्त राहून तपस्वी वृत्तीने, निर्लोभीपणाने केवळ ज्ञानार्जन करणाऱ्या व धर्म संस्कृती, नीती, न्याय यांचे पालन-पोषण करणाऱ्या ऋषीमुनींप्रमाणेच त्यांचे आचरण होते.

त्यांच्याबद्दल एक आठवण अशी आहे की, डॉ. कागवा हे जपानी सद्गृहस्थ भारतात आले होते. डॉ. कागवा यांच्यावर महात्मा गांधी यांच्या विचारसरणीचा प्रभाव होता. त्यांच्यावर असलेल्या गांधीजींच्या आचारविचारांमुळे त्यांना 'जपानचे गांधी' म्हणत असत. डॉ. कागवा एकदा गांधीजींना भेटण्यासाठी भारतात आले असता त्यांनी भारत दर्शनाची इच्छा प्रगट केली. त्यावर गांधीजी त्यांना म्हणाले, 'तुम्हाला खराखुरा हिंदुस्थान पहावयाचा असेल तर आग्र्याचा ताजमहाल, रवींद्रनाथ टागोरांचे शांतिनिकेतन व महर्षि अरविंद घोष यांचा पाँडेचरीच्या आश्रम व त्यांच्या भेटीबरोबरच भारतीय तत्वज्ञ डॉ. राधाकृष्णन यांची भेट अवश्य घ्या.

रशियाचा नेता स्टॅलिन याच्या कर्तृत्वाचा दबदबा रशियात व जगभर पसरला होता. स्टॅलिन सर्वसाधारणपणे कोणालाच किंवा कोणत्याच राष्ट्राच्या वकिलाला कधीही भेटत नसे. स्वतंत्र भारताचे रशियातील पहिले वकिल म्हणून डॉ. राधाकृष्णन् यांची नियुक्ती झाली होती. डॉ. राधाकृष्णन् यांची कीर्ती ऐकून स्टॅलिनने सांगितले की, 'चोवीस तास अध्ययन करणाऱ्या त्या भारतीय प्रोफेसरला मला भेटायचे आहे. स्टॅलिन व डॉ. राधाकृष्णन् यांची भेट झाली.

अंतराळात मानव आज सहजपणे संचार करतो आहे त्या मानावाला डॉ. राधाकृष्णन यांनी सांगितले आहे, 'माणसाने अंतराळात खुशाल जावे, अन्य ग्रहांवर हिंडून यावे, परंतु आपल्या पावाने नीट जमिनीवर आधी चालायला शिकावे. त्याशिवाय त्याची बुद्धी, हुशारी व्यर्थ आहे.

यावरून आपल्या लक्षात येईल की वैज्ञानिक दृष्टिकोण असो की समाजपरिवर्तन, सामाजिक सामंजस्य असो, त्यात शिक्षकांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. आज साऱ्या जगातील विकसित देशातील लोकांना आश्चर्य वाटते की, विकसनशील भारतातील विद्यार्थी हे त्यांच्या देशातील विद्यार्थ्यांच्या बरोबरीने कार्य करण्याच्या क्षमतेचे आहेत. आज भारतीय विद्यार्थ्यांचे अभियांत्रिकी व डॉक्टर होणाऱ्यांचे कर्तृत्व विशेष अर्थाने गौरवले जाते व त्यांना तेथे मानही मिळतो.

आज २१ व्या शतकात आपण पाऊल टाकले आहे. भारताचे राष्ट्रपती डॉ. कलाम हे वैज्ञानिक आहेत. त्यांनी राष्ट्रपतीपदाची शपथ घेतल्यावर आपल्या पहिल्या भाषणात सांगितले की, पुढील २५ वर्षांत आपला देश विकसित देशांत गणला गेला पाहिजे. हे होण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांचा समन्वय आवश्यक आहे. म्हणजेच

विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेचे समाधान अध्यापकांनी केले पाहिजे.

**मग शिक्षण म्हणजे काय ?**

केवळ बौद्धिक भरारी म्हणजे शिक्षण नव्हे तर विविध प्रवृत्ती व भावना यांना योग्य असे सुसंस्कृत वळण लावणे म्हणजे शिक्षण होय. शिक्षणातून केवळ साक्षर निर्माण करावयाचे हा हेतू नाही तर सुंदर, सर्वगुण संपन्न व सुसंस्कृत माणूस निर्माण करणे होय ! शिक्षण हे फक्त नोकरीचे साधन नाही तर सर्वांना उत्तमातला उत्तम नागरिक बनविण्याचे साधन आहे.

मानवाच्या जीवनाश्यक गरजा अन्न-वस्त्र-निवारा, आरोग्य व शिक्षण आहेत. ह्या शिक्षणानेच पूर्ण होतात. शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना म. फुले म्हणतात.

'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले.' यातून एकच गोष्ट आपल्याला लक्षात येईल की विद्येने अविद्येवर मात करता येते. सावित्रीबाई फुले शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना म्हणतात,

'शूद्राना सांगण्यासारखा शिक्षण मार्ग हा ।
शिक्षणनो मनुष्यत्व येते, पशुत्व हाटते पहा ।'

असे हे शिक्षणाचे महत्त्व आम्ही सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांत रुजवले पाहिजे कारण शिक्षण आपले जीवन घडवते, चरित्र घडविते, चांगले विचार आपण आत्मसात करू शकतो.

परंतु आजच्या जीवनात सुख कणभर व दुःख मणभर अशी स्थिती निर्माण झाली आहे. कारण पैशाला बाजवीपेक्षा जास्त दिलेले महत्त्व होय. आज ज्ञानापेक्षा पैशाच्या पाठीमागे माणसे धावू लागली. शिक्षण व शिक्षकांची उपेक्षा होऊ लागली. तरीसुद्धा ही विचारसरणी बदलण्याचे प्रयत्न शिक्षकांनीच करणे आवश्यक आहे. कारण शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणाने व्यक्तीच्या ठिकाणी नवे अनुभव निर्माण करता येतात. हे काम कर्मवीर भाऊराव पाटील, साने गुरुजी, डॉ. राधाकृष्णन् यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन शिक्षकांनी केले पाहिजे.

शासनाने सुद्धा नियम करताना अशाच शिक्षकांची नेमणूक करण्याची परवानगी द्यावी की जात, धर्म, वशिला, राजकारण, बाजारीकरण याला महत्त्व न देता जे खरोखरच ज्ञानवंत, प्रतिभावंत आहेत, ज्यांना खरोखरच शिक्षक म्हणून अभिमानाने ज्ञानदान करावयाचे आहे. कारण शिक्षक हा राष्ट्राचा शिल्पकार असतो.

'शिक्षक दिना'च्या निमित्ताने शिक्षण क्षेत्रातील सर्वांनीच आपले क्षेत्र अधिक पवित्र उदात्त करण्यासाठी विद्यार्थीरुपी पोहऱ्याला ज्ञानाच्या आडापर्यंत पोचवण्याचे कार्य रहाट बनून करुया.

सामाजिक बांधिलकी, ज्ञाननिष्ठा, सेवा परायणता, विद्यार्थीनिष्ठा आणि बदलत्या सामाजिक, राष्ट्रीय समस्यांचे डोळस आकलन यातूनच शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर्श साकार होईल.

**सौ. शोभना श. मराठे,**
१/१, दिवेकर बिल्डिंग, ब्राह्मणसभा हॉलजवळ,
सुभाषपथ (स्टेशनरोड), ठाणे (प.) - ४०० ६०१.
फोन : २५३३४८१४


# दिपावलीनिमित्त
# हार्दिक शुभेच्छा !



# नियमित योगासने

*योग, ध्यान धारणा यासंबंधीचे अनुभवी ज्येष्ठांचे लेख दिशात अधूनमधून आम्ही देतो. त्यात पुनरावृत्ती असू शकते. त्यामागील उद्देश चांगल्या सवयींचा विचार आणि आचार सुरु व्हावा. श्री. साठे स्वत: योगशिक्षक आहेत.*

*- संपादक*

आपल्या पूर्वजांच्यापेक्षा आज आपल्याला भरपूर पैसा मिळतो आहे. अन्न, वस्त्र, निवारा ह्यावरच फक्त पैसे खर्च करायचे ठरवले तर उरलेले पैसे ठेवायचे कुठे हा प्रश्नही अनेकांना सतावतो. त्यातून मग फ्लॅट, कार, स्कूटर, कूलर सारखी साधनं घेण्याकडे कल वाढू लागतो. ह्या सर्व साधनांमुळे आज ऐषोआराम मिळतो. शारीरिक धावपळ दगदग वाचते सुख मिळते पण... समाधान मिळते का? दमा, क्षय, हिवताप सारखे सोपी नांव असणारे रोग जाऊन, आज ज्यांची नावही घेता येणं कठीण असे अनाकलनीय रोग उग्र स्वरुप धारण करूनच उभे राहत आहेत. त्यांच्याशी मुकाबला करण्यासाठी विविध औषधे, दवाखाने स्पेशालिस्ट, हॉस्पिटल्स गल्लोगल्ली उभी रहात आहेत. कारण रोग, व्याधी वाढल्या पण त्यांच्याशी सामना करणारं शरीर दोन हात, दोन पाय, हृदय यांचच आहे. त्यात बदल नाही.

मिक्सर ग्राइंडरमुळे हातांना आराम, स्कूटर-मोटरमुळे पायांना आराम, कॅलक्युलेटर-कॉम्प्युटरमुळे स्मरणशक्ती, विचारशक्ती यांना विश्रांती. ह्याचा परिणाम म्हणजे शारीरिक व मानसिक दुर्बलता, नैराश्य, सर्जनशीलतेचा अभाव. सुख आहे पण समाधान, शांती नाही. म्हणजे एव्हढं लांबलचक आयुष्य असं तणावाखाली, कुरकुरत घालवणं कुणाला आवडेल !

संपूर्ण आयुष्यभर कामात मग्न राहणं, शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त राहणं, मनोधैर्य कायम राहणं, उत्साही राहणं यासाठी योगाभ्यास हाच एकमेव उपाय आहे हे देश-विदेशात मान्य झालं आहे.

शरीराला सतत मनाची साथ असणं म्हणजे योग. योग ६००० वर्षाइतका जुना आहे, पण तेवढाच आजही ताजा आहे, उद्यापण तो अधिक उपयोगी पडणारा आहे.

योग म्हणजे फक्त आसनं-प्राणायाम नव्हे,

यम-नियम-आसन-प्राणायाम-प्रत्याहार-धारणा-ध्यान-समाधी = योग.

योगासनं शारीरिक स्वास्थ्यासाठी तर प्राणायाम मानसिक शांती व उन्नतीसाठी आहे.

योगासन-प्राणायाम तरुणांपासून अतिवृद्धापर्यंत निरोगीपासून रोगग्रस्तापर्यंत कुणीही करू शकतो. मात्र पुस्तकांत, टी.व्ही.वरील ऐकीव माहितीवर आसनं करू नयेत. योग्य त्या गुरुच्या मार्गदर्शनाखालीच योगाभ्यास करावा.

## आसनाचे प्रकार

१) **ध्यानात्मक आसने** : पद्मासन - स्वस्तिकासन - वज्रासन - सिद्धासन

२) **शरीरोपयोगी आसने** - पश्चिमतानासन, हस्तपादासन, हलासन, सर्वांगासन, हलासन, सर्वांगासन, योगमुद्रा (पाठीच्या कण्याला पुढे बाक देणारी), भुजंगासन-शलभासन-नौकासन-धनुरासन (मागे बाक देणारी). उत्तानवक्रासन-अर्धमत्स्येंद्रासन-त्रिकोणासन (पीळ देणारी), ताडासन-पर्वतासन (वर खेंच देणारी).

३) **विश्रांतीकारक आसने** : अ) शवासन ब) मकरासन व ३) शशकासन

| आसने | फायदे |
|---|---|
| पश्चिमतानासन-पर्वतासन | विशिष्ट वयात उंची वाढणे, उत्साह येणे, किरकोळ पाय दुखी थांबणे. |
| सर्वांगासन-हलासन | मानसिक शांती, वीर्यदोष नाहीसा होणे, हृदयाला विश्रांती, पोटाचे विकार नाहीसे होणे. |
| भुजगं-शलभ-नौकासन | पाठीच्या कण्याला आराम मिळणे, त्याचे आरोग्य सुधारणे, छाती रुंदावणे, आत्मविश्वास वाढणे. |
| अर्धमत्स्येंद्रासन, हलासन, त्रिकोणासन | मधुमेह प्रतिबंधक, कंबरेची दुखणी दूर करणारी |
| प्राणायाम | शरीरांतर्गत ऊर्जा - शक्तीची वाढ - त्यामुळे शरीरांतर्गत घडामोडी शिस्तीत, सुरळीत, मन: शांती, मेंदुला उत्तम रक्तपुरवठा, रक्ताची पत सुधारणे, श्वसनदोष नाहीसे होतात. मनाची दुर्बलता रहात नाही. एकूणच शारीरिक आणि मानसिक स्वास्थ उत्तम राहते. |

काही व्याधी, रोग, आजार, ऑपरेशन झाले असणाऱ्यांनी डॉक्टरचा सल्ला आधी घेऊनच योगाभ्यास सुरू करावा.

निरोगी व्यक्तीनी कुठलेही आसन शिकायला हरकत नाही. आसने सकाळी किंवा संध्याकाळी, रिकाम्या पोटी करावीत.

ओढाताण, घाईगर्दी, आसनं करतांना टाळावी. श्वास रोखू नये. आसने करतांना सैल कपडे असावेत.

आजूबाजूचे वातावरण प्रसन्न असावे. आसने नियमित, रोज खंड पडू न देता केली तरच अपेक्षित लाभ होईल. आसनांबरोबरच आहार व निद्रा (झोप) पण योग्य असणे आवश्यक आहे.

**गोविंद साठे**

ई-१, पूर्वा सोसायटी,
पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम).
फोन : २५४३ ५२६५

'दिशा'
नियमित
वाचा

# उपरा

*विद्यार्थ्यांनी वाचावे असे वाटत असल्यास वाचून झाल्यावर त्याला प्रतिक्रिया लिहून मागण्याचा माझा प्रयोग चालू असतो. वाचन, लेखन या प्रक्रियांतून गेल्याने त्याच्या विचारांना, वाचनाला दिशा मिळू शकते. अशीच एक प्रतिक्रिया. मात्र ही प्रतिक्रिया देणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव त्या प्रतिक्रियेवर नव्हते.* *- ग्रंथपाल*

११ वी चे वर्ष, मराठीचा पाठ्यक्रम, नेहमीप्रमाणे आधी ऐतिहासिक वाङ्मय नंतर चिंतनात्मक नंतर विनोदी धडे आणि शेवटी ग्रामीण आणि दलित वाङ्मय.

दलित वाङ्मयात आठवणीने आठवतो लक्ष्मण मानेंचा धडा. वास्तविक वाचल्यावर समजलं की मानेंच्या 'उपरा' ह्या पुस्तकातून हा धडा घेतला आहे. त्याचवेळी 'उपरा' विषयी आकर्षण आणि 'उपरा' वाचण्याची ओढ मनाला लागली. भाषा अवघड वळणाची व ग्रामीण असली तरी वाक्यातील प्रत्येक शब्द अन् शब्द फक्त व्यथाच पाझरताना दिसला.

नंतर काही काळ विस्मरणाने अथवा अभ्यासाच्या व्यापाने उपरापासून खऱ्या अर्थाने उपरा राहिलो. नंतर एम्.एस्सी.चं वर्ष, बांदोडकर कॉलेजच्या लायब्ररीत एक दिवस सहज पुस्तकं चाळताना लक्ष्मण मानेंचं 'उपरा' दिसलं आणि जुन्या आठवणी स्मरल्या आणि नकळत पटकन पुस्तक बाहेर काढलं गेलं.

अर्ध पुस्तक वाचलं आणि पुस्तक अत्यंत चमत्कारिकरीत्या माझ्याकडून हरवलं आणि लायब्ररीयन पाठक सरांकडे गेलं. पुस्तकाच्या शोधार्थ त्यांच्याकडे गेल्यावर माझ्याकडून झालेल्या चुकीची मी क्षमा मागितली व त्याची शिक्षा म्हणून हे लेखन आणि म्हणूनच पुस्तकाचा हा परिचय.

'उपरा' हे लक्ष्मण मानेंचं आत्मचरित्रपर लेखन. आपलं जीवन सर्वांसमोर उघडपणे मांडणं हे मुळातच कठीण काम.

अनेक कवी, लेखक, साहित्यिक, नामवंत व्यक्ती आत्मचरित्र लिहितात. अत्यंत निकोप आणि अनुकुल परिस्थितीत जन्माला आलेल्या व्यक्तींची आत्मचरित्रे आपण वाचतो. या ठिकाणी अनुकूल परिस्थितीत मुळच्या प्रकृतीगुणांना वाव मिळाल्या कारणाने या व्यक्ती आयुष्यात काहीतरी झालेल्या असतात. अशा व्यक्तींची आत्मचरित्रे आणि लक्ष्मण मानेचं 'उपरा' यात निश्चितच फरक आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवनाशी झगडत आयुष्यातील लक्ष्य साध्य करणाऱ्या मानेंचं आत्मचरित्र वाचलं की ते जास्त वैशिष्ट्यपूर्ण आणि स्पृहणीय वाटते.

पुस्तकातील लेखनात भाषा ग्रामीण वळणाची असली तरी त्यात सत्याची आर्तता जाणवते. लेखन जास्तीत जास्त उठावदार होण्यासाठी वापरण्यात येणारे भले मोठे वाङ्मयीन शब्द, शृंगारिक शब्द, मोठी न तोडलेली वाक्ये हे कुठेही लेखकाने साधण्याचा प्रयत्न केलेला नाही आणि म्हणूनच लेखन कुठेही विषय सोडून गेल्यासारखं वाटत नाही आणि तितकच पोटतिडकीचं वाटतं.

पुस्तक हातात घेतल्यावर प्रथम दिसते ते मुखपृष्ठ, सगळीकडे साधेपणा जपणाऱ्या पुस्तकाचं मुखपृष्ठही तितकच साधसुधं.

मुखपृष्ठावर एक गाढव आणि त्यावर लादलेला भटक्या जमातीचा संसार.

प्रस्तावने आधी हे पुस्तक लेखकाने 'ज्यांनी वळण्याची पाटी सोडून लिहिण्याची पाटी हातात दिली त्या आई वडिलांना, अत्यंत संकटात साथ देणाऱ्या पत्नीस व सामाजिक जाणीव देणाऱ्या सामाजिक युवक दलास' हे पुस्तक अर्पण केल्याचे दिसून येते.

नंतर येते प्रस्तावना. बऱ्याच पुस्तकाची सुरुवात मान्यवरांच्या प्रस्तावनेने होते पण 'उपरा'ची प्रस्तावना स्वत: लेखक लक्ष्मण मानेंनी लिहिलेली.

प्रस्तावनेत ज्यांनी लेखकाला पुस्तक लिहिण्याबद्दल प्रोत्साहन दिलं त्या अनिल अवचट यांचा प्रामुख्याने उल्लेख नंतर श्री. प्रमोद कापर्डे आणि समाजवादी युवक दलाच्या नेत्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता.

प्रस्तावनेत पुढे या पुस्तकामुळे भटक्या विमुक्त जाती जमातींच्या प्रश्नावर सामाजिक मंथन सुरु व्हावं आणि पिढ्यान्‌पिढ्या बिऱ्हाड पाठीवर घेऊन गाढवाचं जिणं जगणाऱ्या कैकाडी जमातीच्या वेदना समाजाने जाणून घ्याव्या याबद्दल अत्यंतिक कळकळ लेखकाने व्यक्त केली आहे.

पुस्तकाच्या सुरुवातीला लेखक आपल्या अवताराचे व ओंगळपणाचे वर्णन करून वास्तवाची जाणीव करून पुस्तकाची सुरुवात करतो.

लेखकाच्या शाळेची सुरुवात सांगताना, एके दिवशी सकाळीच लेखकाचे वडील लेखकाला सकाळी उठवून आजपासून शाळेत जायचं म्हणून सांगतात आणि विंचू चावल्यासारखी लेखकाची स्थिती होते. रोज गाढवं चरायला नेणं हा लेखकाचा धंदा. गाढवं आणि लेखक यांच्या अवतारात फारसा फरक लेखक करत नाही आणि म्हणतो 'गाढवासंग ढसा ढसा पाणी प्यालो.'

फोकं तोडून ते चिरून त्याची टोपली, उफण्या, कणगी करून गावात विकून त्या बदल्यात कधी पैसे तर बहुतेकदा शिळपाकं आणून त्यावर कुटुंबाचं पोट भरणं अशा रितीने आई वडिलांची चाललेली गुजराण.

अचानक वडील लेखकाला शाळेत घेऊन जातात. जाताना लेखकाची रडवी सुरुवात आईचं आणि शेजाऱ्या पाजाऱ्यांचं समजावणं तरीही वडिलांचा हट्ट आणि शेवटी देवळाच्या अंगणातील शाळा.

शाळेत लेखक वावरतो आणि इतर मुलांच्या लेखकाला बघून दिसणाऱ्या कुत्सित नजरा लेखकाला दिसतात. लेखक वर्णन करतो, 'पिलात पिलू आलं की डिवचून घालवल्यात तसं ही सारी पोरं मला डिवचायला लागलेली त्यात माझा अवतार म्हणजे उकिरड्यातल्या कुत्र्यासारखा पहिल्या दिवशी लेखकाचं शाळेत मन लागत नाही. त्याला डोळ्यापुढे आई, वडिल, भावंडे, फोका गाढवे दिसतात आणि लेखक शाळेतून पलायन करतो व मासे पकडायला जातो. घरी येऊन यापुढे शाळेत जाणार नाही असे आईला सांगतो. आई या विषयावर वडिलांना खूप बोलते. वडिलांचा पारा चढतो आणि आईच्या अंगावर वळ उठतात. हा प्रसंग लेखकाच्या आयुष्याला कलाटणी देऊन जातो आणि यापुढं शाळेत जायचंच असं लेखक ठरवतो. आता शाळेच्या वेळात गाढवं सांभाळण्याची जबाबदारी लेखकाच्या धाकट्या बहिणीवर येते आणि लेखकाचे शाळेत जाणे सुरू होते.

सकाळी आईने गावातून आणलेलं शिळपाकं खाऊन लेखकाची शाळा सुरू होते. शाळेच्या सुरुवातीला बालमनातील तुलनात्मक भावना पुढे येते. इतरांकडे पाटी-पेन्सिल असते पण याच्याकडे काहीही नसते. इतरांकडे चांगले कपडे पण लेखकाकडे साधे पण नसतात.

जेमतेम आठ दिवसाची शाळा झाल्यावर काम संपल्यामुळे आई-वडिलांना बिऱ्हाड हालवावं लागतं आणि लेखकाची त्या गावातील शाळा संपते. बिंचवाचं बिऱ्हाड पाठीवर त्याप्रमाणे लेखकाच्या घरातील संसार आणि घर. त्यामुळे पदरात पडणारी वाऱ्यावरची शाळा जी त्यांच्या समाजात कुणीच बघितलेली नसते.

लेखकाचं घर नेहमीच उकिरड्यावर आणि गावाबाहेरील घाणीत. अशाच एका ठिकाणी ते उतरतात. नवीन गावात उघड्यावर मांडलेला संसार बघायला पोरं येत असतात. आई त्यांना हाकलत असते आणि आपल्या जीवनाचा हा उघड्यावरचा तमाशा लेखकाला बघवत नसल्याचे दिसून येते.

समाजातील अंधश्रद्धेचं पण लेखक वर्णन करतो. आपल्या बहिणीला लागलेलं भूत आणि आपल्या वडिलांच्या अंगातील वारं याचं वर्णन करून अंधश्रद्धेत अडकलेला समाज दर्शवतो.

त्या गावातही लेखक आपली शाळा चालू ठेवतो. मास्तर त्याला शाळेत घ्यायला नकार देतात. 'तू शिकलास तर कणगी कोण वळणार' असे म्हणतात. पण तरीही लेखक शाळेबाहेर शाळा शिकतो.

वडिलांच्या डोळ्यातील पाणी आणि लेखकाचं मास्तर व्हायचं पाणीदार स्वप्न यातून दिसतं. असचं बिऱ्हाड हालत असतं आणि लेखकाची शाळा पडवी बदलत असते.

अशाच एका गावी लेखक येतो. त्या गावची जत्रा. भले कपडे चांगले नसली तरी मागून आणलेले कपडे, नैवेद्य म्हणून चपाती केली जायची. नैवेद्य समजून सगळ्यांचं दारु पिणं, या सगळ्याचा विचित्र अनुभव लेखक लहानपणीच घेत असतो.

याच जत्रेत भेटलेल्या म्हाताऱ्याचे वर्णन करतो आणि स्वत:च्या व इतर समाजातील स्त्रियांच्या असुरक्षिततेचे वर्णन करतो. ज्यात त्या म्हाताऱ्याची स्वरूप सुंदर मुलगी रातोरात पळवली जाते व जिवानिशी जाते. यात प्रथमच लेखक आपल्या समाजावर इतर समाजाकडून होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडतो.

नंतर लेखक त्यांच्या समाजातील कोर्टाचे स्वरूप व कार्य सांगतो. ज्यात न्याय द्यायला दोन ओकाळे असतात व खटल्याला ओक म्हणतात. वादी, प्रतिवादींना बोलण्यास परवानगी नसते तर त्यांच्या वतीने जमीनदारच बोलतात. यात लेखक एका बाईचा खटला सांगतो- जेथे पैशासाठी एक माणूस आपली बायको दुसऱ्याला विकतो व तिचा वस्तूप्रमाणे वापर होतो. मानवी मनाची कुचंबणा व समाजाची अधोगती लेखक यातून दर्शवतो.

लेखकाच्या समाजाला पोट भरण्यासाठी लागलेली उचलेगिरीची सवय आणि यातच एका प्रसंगाला बळी पडलेले लेखकाचे आई-वडिल. आई-वडिलांना झालेली मारहाण आणि आईवर झालेली गलिच्छ शब्दफेक आणि त्यातून मनातून वरिष्ठ समाजाविषयी येणारी चीड व सूडाची भावना. त्यात रामभाऊ सारखा वरच्या जातीचा माणूस पण खालच्यांसाठी सुद्धा माणुसकीची भावना ठेवणारा व त्यांना न्याय मिळवून देणारा लेखकाला आदर्श वाटतो आणि यातून लेखकाचं व्यक्तिमत्त्व घडत जातं.

या सर्व व्यवसायाबरोबरच बँण्ड वाजवायचा धंदा सुद्धा लेखकाचे वडिल करत असत. आठ-आठ दिवस खायला नसे. त्यावेळी पाण्यात भाकरी चुरून लेखक खात असे. अशातच लेखक बँण्डच्या ताफ्यात शिरतो. दहा-बारा दिवस घरापासून बाहेर घराची, आईची, भावंडांची खूप आठवण येत असते. पण लेखक म्हणतो, 'घरी उपासमार त्यापरीस ही भटकंती बरी असते.'

अशातच लेखकाची शाळा चालू असते अशाच एका शाळेत प्रवेश होतो आणि सर्व पोरांत आपण खूपच मोठे असल्याची त्याला जाणीव होते. मास्तर वय, गाव विचारतात पण ते माहित नसल्यामुळे सोयिस्कररित्या योग्य वाटेला ते लावतात.

पावसाळ्यात लेखकाची बिऱ्हाडं कोकणात असायची आणि दसऱ्यानंतर घाटावर. अशातच लेखकाच्या धाकट्या भावाचा जन्म होतो.

समाजातील पुरुषप्रधान संस्कृती लेखकाला जवळून बघायला मिळते. लेखकाची मामी सुंदर असते व नीटनेटकेपणाची आवड असणारी असते हेच तिचा घात करतं. अशा प्रसंगात मामा तिला सोडून देतो. कित्येक महिने बिऱ्हाडाबरोबर राहून नंतर ती वेडी होऊन मरते. तिचा मृत्यू लेखकाला चटका लावून जातो आणि आतून अन्यायाविरुद्ध पेटणाऱ्या कुंडात आणखी एक आहुती पडते.

त्यानंतर एक दिवस लेखकाची आत्या घरी येते व आपल्या मुलासाठी लेखकाची धाकटी बहीण सर्मी हिला मागणी घालते. वडिल नकार दर्शवितात पण आत्या चोळी-

बांगडी घ्यायला तयार नसते शेवटी बसल्याजागी समीचा साखरपुडा होतो.

वडील मास्तरला कणगी, टोपली तसेच मोफत द्यायचे आणि लेखकाची शाळा चालू असायची. आता शाळा, मास्तर लेखकाच्या परिचयाचे असतात. अशातच पहिलीची परिक्षा घेतली जाते. लेखकाला जेमतेम १, २ काढता येत असतात. पास होण्याची अपेक्षा नसतेच. एक दिवस लेखकाचे वडिल तो पास झाल्याची बातमी आणतात. वडिलांच्या डोळ्यातून आनंद ओसंडत असतो. आई नजरेआड करायला तयार नसते आणि या पोकळ यशातच लेखकाचं मन मास्तर बनण्याची स्वप्नं बघत असतं.

वैशाखात काहीच काम नसल्याने लेखकाचे वडील बँड वाजवायचे. लेखक त्यातच घुंगऱ्या वाजवायचा.

दोन वेळी धड अन्न न मिळणाऱ्या कैकाडी समाजाला कुणाकडचं लग्न म्हणजे पर्वणी ठरायची. लेखक आणि इतर मुले घराबाहेर वाढ वाढ म्हणून भीक मागायचे. पंगत उठायची वाट बघायचे पंगत उठली की खरकट्या पत्रावळ्यांचे ढीग पडायचे. त्या पत्रावळ्यांवर लेखक तुटून पडे. खरकट्यातून वेचून घेई. कुत्री चाटायच्या आत सगळं उरकायचं. अशारीतीने लेखकाचं बालपण शाळा शिकत शिकत चाललं होतं. वडिलांच्या मनात मुलाच्या शिक्षणाबद्दल अभिमान असायचा व ते इतर साथीदारांना आपापली मुलं शिकवा म्हणून सांगायचे. निदान पत्र वाचण्याइतपत तरी मुलांनी शिकावं इतपत इच्छा.

लेखकाचं चौथीपर्यंतचं शिक्षण असंच होतं आणि आता लेखक घरीच एकटा राहण्याची इच्छा व्यक्त करतो. कारण बिऱ्हाडाबरोबर फिरायचं तर शाळेचं नुकसान रामभाऊंच्या आधारे तो रहातो.

शाळेत कांबळे मास्तर खूप सहकार्य करतात. त्यांच्याकडेच खाणंपिणं होतं. आता लेखकाची शाळा व्यवस्थित होत होती. तो बँडमधेही वाजवत असे. आता लेखक ६वीला आलेला असतो. मुलांच्या नादानं जगतापांच्या लग्नात पंगतीला बसतो. पण वाढपी वाढता वाढता त्याला ओळखतो आणि शिव्या घालत ताटावरून उठवतो, आणि लेखकाला आपली पायरी समजते. सतत जात आडवी येत असते. घरी वडिल चिडलेले असतात.

सहावी काठावर पास होऊन सातवीत जातो. कपडे, वह्या, पुस्तके बँडच्या पैशातून भागतात.

लेखक सातवी पास होतो आणि आठवीच्या परीक्षेला शहरात जाणार असतो. सगळ्यांना घरून डबे येणार असतात पण लेखकाला डबा कोण देणार, तशातच परीक्षा देतो. परीक्षा झाल्यावर मास्तर फोटो काढण्यासाठी एका मुली शेजारी बसवतात.

नंतर गावात त्या मुलीवरून वादळ उठवलं जातं. वडिलांना मारहाण होते. लेखक गावाबाहेरूनच फलटणला पळतो नंतर बिऱ्हाड तेथे येतं. आता घरात लेखकाचं लग्न ठरवण्याचा घाट असतो. लेखकाला लग्न तर करायचं नसतं म्हणून तो घरातून पळतो. शहरात आल्यावर त्यांच्यापैकी एक त्याला ओळखतो व पळून आल्याचे समजल्यावर परत बिऱ्हाडावर नेतो. पण आता घरचे लेखकाला बघून नि:श्वास सोडतात आणि लग्नाचा विषय थांबवतात आता लेखक बँडमध्ये वाजवत असतो. मध्ये रिझल्ट लागतो आणि लेखक पास झालेला नसतो.

पुढे नापास झाला तरी फॉर्म परीक्षेला बसल्यामुळे लेखकाला ८वीत प्रवेश मिळत असतो. घरच्यांचा विरोध असतो पण तरीही लेखक हायस्कूलमध्ये जाऊन हेडमास्तरांना भेटतो, परिस्थिती सांगतो. त्यांच्याही डोळ्यात पाणी तरारते व त्याला ते वह्या, पुस्तके देण्याचे आश्वासन देतात. लेखक खुश होतो. हायस्कूलमध्ये दाखल होतो.

थोड्या दिवसातच परत जुन्या गावच्या विद्यार्थ्यांमध्ये सामील होतो पण आता त्याला हायस्कूलमध्ये गावापेक्षा वेगळी आणि चांगली वागणूक

मिळते.

असेच एक दिवस लेखकाला छब्या नवाचा मित्र भेटतो जो दारु बनवत असे आणि फुग्यातून नेत असे. लेखक त्याला मदत करायचा. लेखकाला रोज सकाळी चहा आणि मिसळ मिळत असे. असेच एक दिवस कसेबसे पोलिसांच्या ताब्यातून वाचतात आणि लेखक छब्याचा नाद कायमचा सोडतो.

आता लेखक चांगल्या लोकांत उठत बसत होता. नारायण आणि रामदास सारखे मित्र त्याच्या खाण्या-पिण्याच्या आणि इतर गरजा भागवत असत. त्यातल्या त्यात नारायण जीव की प्राण. लेखक दहावीला आला. तो नारायणाच्या हॉटेलमध्ये काम करीत असे. त्याने तसे करू नये असे नारायणला वाटे. त्याने त्याला दहा रुपये देऊन पाव-बटरचा धंदा करायला सांगितला.

असेच दिवस पुढे ढकलत लेखकाने दहावीची परीक्षा दिली. सुटी पडली पण गावी जाऊ वाटत नव्हतं.

उन्हाळ्याची सगळी सुटी लग्न वाजवण्यात जाते. दहावीचा निकाल लागतो. लेखक पास झालेला असतो. नारायण कोल्हापूरला शेतकी कॉलेजात जातो. लेखक ११ वीला प्रवेश घेतो. नारायण वडिलांना लेखकाला शिकू द्यायला सांगतो व त्याचे सर्व भागवायचे आश्वासन देतो. लेखक मॅट्रिक पास होतो. घरात आता लग्नाचे वातावरण असते म्हणून लेखक पळून कोल्हापूर गाठतो व नारायणकडे जातो. कॉलेजला प्रवेश मिळवतो. कॉलेजमधील नवे वातावरण बघून लेखक हुरळून जातो.

कॉलेजमध्ये मुलींची छेड काढणाऱ्या एका ठगास वठणीवर आणून प्राचार्यांची मर्जी मिळवतो. मित्रांचीच पुस्तके आणि कपडे वापरतो.

मधेच नारायणचं नाट्यमयरित्या लग्न होतं आणि आता रूमवर तिसरं माणूस वाढलं. कॉलेज सुरू होण्याआधी व्यवस्थित भागत होतं. मित्र फलटणवरून पैसे पाठवत असत.

पण आता मात्र लेखक नोकरीच्या शोधात होता. त्यतच प्राचार्यांच्या ओळखीमुळे कॉलेजमध्ये पार्टटाईम नोकरी मिळाली. कॉलेजचं बांधकाम आणि लेखकाची पार्टटाईम नोकरी बरोबरच चाललेली असते. अशातच लेखक एका ब्राह्मण मुलीच्या प्रेमात पडतो पण नारायण त्याला वेळीच सावरतो. लेखक तिच्याशी सविस्तर बोलायचं ठरवतो, बोलतात. लेखकाची जात समजल्यावर ती नकार देते आणि लेखकाची जात परत एकदा घाव घालते.

लेखक एस्.वाय.ला आल्यावर कोल्हापूरात शंकराचार्य यायचे असतात. कट्टर जातिव्यवस्था मानणाऱ्या शंकराचार्यांना काही युवक नेते प्रतिकार करणार असतात. त्यात लेखक सामील होतो आणि सामाजिक स्तरावर तो खेचला जातो आणि अशातच घरमालकांच्या मुलीशी लेखकाचे प्रेमसंबंध जडलेले. इतर मित्रांना ते मान्य नसल्याने इतर मित्रांनी संबंध तोडले. लेखक मानसिकदृष्ट्या खूपच दुखावला जातो. जे मित्र एका ताटात जेवले त्यांनीच पुन्हा जातीचा मुद्दा काढून बाजूला टाकलेलं असतं.

लेखक नारायणला कँटीनचं काम मिळवून देतो. वसतिगृहाची मेस आणि लेबर स्कीम या दोन्हीकडे लेखकाला बघावे लागे आणि यातून अभ्यासाला वेळ मिळत नसे.

अशातच 'साधना' या अंकात राजा ढालेंचा लेख आला. हा लेख खूपच गाजला आणि पाठिंब्यासाठी मोर्चा काढायचं ठरवलं आणि लेखक सामाजिक कार्यात सक्रिय झाला. मुलांची मत वळवायची मुलं पेटवायचं काम लेखक चांगलं करीत असे.

शेवटी मोर्चा निघाला आणि या कारणामुळे लेखकाला नोकरी गमवावी लागली. आता परत पोटा-पाण्याचा प्रश्न आला. लेखक पाटगावकरांकडे गेला असता त्यांनी त्याला भाऊंकडे म्हणजे वि.स.खांडेकरांकडे जाण्यास

सांगितले. त्यांच्या ओळखीने 'आंतरभारती' या शाळेत शिक्षकाची नोकरी मिळाली. पण भाऊंच्या शिस्तबद्ध आयुष्याशी लेखकाच्या बेशिस्त आयुष्याचं जमेना.

लेखकाने आता शशीबरोबर लग्न करायचा नक्की ठरवलं. त्याच्या या निर्णयाला सर्वांनी सहमत दर्शविलं. नंतर काही अडचणी येऊ नयेत म्हणून रीतसर कोर्टाची सर्व कागदपत्रे केली पण शशी कपडे भरताना पकडली गेली. परत एकदा हिम्मत बांधली आणि शशी घरातून सटकली साधेपणाने अक्षता पडल्या.

लेखकाने गाव सोडलं आणि लेखक सातारा एस.टी.स्टॅण्डला आला. तिथे एका पोलिसाने हटकलं आणि लग्नाची पहिली रात्र पोलिस स्टेशनमध्ये गेली आणि नंतर खोली बघायला सुरुवात. आता संसार मागे लागला. होते ते पैसे पुरवायचे होते कारण नोकरी मिळत नव्हती.

मधेच गावाकडून आई-वडिल येतात. आई शशीला आणि लेखकाला नको नको ते बोलते. शशीचा स्वीकार करायला कोणीच तयार नव्हतं. सगळ्यांना आता जातपंचायत वाळीत टाकणार याचीच भीती होती.

आई-वडिलांचे नको ते बोलणे, लहानपणी घास भरवलेले, आई-वडिल आता असे कसे वागतात हे लेखकाला कळत नसतं. त्यातच लेखकाचं आजारपण घरात पैसा नसतो. शशी हातातलं घड्याळ विकून लेखकाला डॉक्टरकडे नेते.

दिवस जात होते. दिवस दिवस उपास घडत होता. आता मात्र लेखकाने निर्णय घेतला मिळेल ती हमालाची नोकरी करायची नाहीतर दोघांनी जीव द्यायचा.

असंच एकदा शेजारच्या मुसलमानांकडे लग्न होते. लेखक सकाळपासून मांडवात घुटमळत होता. सगळे बिर्याणी खात होते पण लेखकाला कोणीही जेवायला बसवत नव्हते. तेव्हा लेखकाला लहानपण आठवले आणि पत्र्यावळ्यांवर तुटून पडावं असं वाटलं पण शशीचं काय? तिला असला प्रकार माहीत नव्हता.

नंतर समजले की आंतरजातीय विवाहाला सरकार मदत देते म्हणून जिल्हापरिषदेत अर्ज केला. अनेक खेपा घातल्या पण शेवटी सरकारी कामकाजाच्या दिरंगाईमुळे तिथेही काही मिळाले नाही.

आता दिवस खूपच वाईट आलेले. लेखक एकटा असे तेव्हा काहीही करू शकत असे पण आता शशी होती पण शशी सगळं निभावून नेत असे.

आता लेखकाचा माणसावरचा आणि माणुसकीवरचा विश्वास उडाला होता. जन्मदात्यांनी संबंध तोडले तर दुनिया परकीच होती. अशातच लेखकाची भेट सामाजिक युवकदलाचे कार्यकर्ते श्री नरेंद्र दाभोळकरांशी होते. ते लेखकाला घरी बोलवतात. घरी गेल्यावर लेखक आपल्या परिस्थितीची सारेगम सुरू करतो. दाभोळकर लेखकाला धान्याच्या पिशव्या भरून देतात आणि काही कमी जास्त लागल्यास मागायला सांगतात.

घरी येऊन लेखकाला रडू आवरेना. आता लेखक दलाच्या सर्व बैठकींना जात असे. घरची काळजी आता दल म्हणजे दाभोळकरच वहात असत. शशीला एका मुसलमानानं आपलं शिवणयंत्र मोफत वापरायला दिलं आता थोडीफार अंधुक दिशा मिळत होती.

दाभोळकरांनी शशीला शिवणकाम आणून दिलेलं असतं. राबराबून शशीला आठवड्याला १५, २० रुपये मिळत असत. आता लेखकाला निदान उपाशी तरी रहायण्याची वेळ टळत होती.

अशीच साताऱ्याला व्याख्यानमालेत यदुनाथ थत्तेंशी ओळख होते. दाभोळकर सर्व परिस्थिती सांगतात. थत्ते बघतो म्हणतात, काही दिवसाने तार येत आणि तावडतोब बोलावणं येतं.

तेथे बाबाजी आणि माताजींनी वसतिगृहाची जबाबदारी लेखकावर सोपवली. साताऱ्याला जाऊन लेखक शशी व संसार घेऊन कन्हाटीला येतो.

शाळेत बाबाजींची सत्ता, मुलांना धड मार्क मिळाले नाही तरी त्यांना पास करायचे. याला लेखकाचा विरोध होता व तो ती नोकरी गमावून बसतो.

दाभोळकरांनी पत्र पाठवून परत लेखकाला साताऱ्याला बोलावलं. तिथं कार्यकर्त्यांनी आधीच रूम बघून ठेवलेली असते. नोकरी नाही आणि त्यातच शशी आई होणार असते. कशीबशी एका सिनेमागृहावर डोअरकिपरची नोकरी मिळते. ६० रुपये पगार. सकाळी ११ ते रात्री १२. नंतर दाभोळकरांच्या कापडाच्या दुकानातून लेखक ब्लाऊजपीस विकत घेऊन ते विकण्याचा धंदा करतो. पैसे बऱ्यापैकी मिळत. अनेकदा पदरात फसवणूक पडे. लॉटरी फुटली तर ठीक नाहीतर फेस येईपर्यंत फिरणे.

शशी अशावेळी घरात बसून पाकिटं चिकटवत असे. तिला बघून लेखकाला अत्यंत वाईट वाटे. श्रीमंत घरातील मुलगी पण आपल्यासाठी दोन-दोन दिवस उपाशी राहते हा विचार त्याला सतत डिवचत असे.

असेच दिवस जात होते आणि एक दिवस लेखकाचे आत्या, मामा घरी येतात. जगला वाचला कोणी विचारत नव्हतं आणि आता यांचं आगमन.

मामा अत्यंत मनमोकळेपणाने बोलला. लग्नाचं आमंत्रण घेऊन आला होता. लेखकामुळे आई-वडिलांना आता वाळीत टाकलं होतं. ज्यांनी गरिबीशी अहोरात्र लढाई केली त्यांचे उतारवयात लेखकामुळे धिंडवडे निघालेले असतात.

शेवटी लेखक आपला स्वाभिमान गुंडाळून ठेवतो आणि लग्नाला जायला निघतो.

शशीला घेऊन लेखक गावी जातो. गावात कुणी शेजारून पण ओळख देत नसतं.

लग्नाच्या आदल्या दिवशी जातपंचायत बसते आणि शशीची चौकशी सुरू होते. तिला जातीत घ्यायला कोणीही तयार नसतं. अखेर तोडगा सुचवला जातो आणि आत्या, मामा शशीला दत्तक घेतात.

आता लेखकाचा पुन्हा विवाह होणार असतो. लेखकाला या गोष्टी पटत नसतात. पण जातीपुढे लेखक गुडघे टेकतो. जात शशीला पत्करायला तयार असते पण मुलाला पत्करत नसते कारण त्यांच्या दृष्टीने ते लग्नाआधीचं असतं.

त्याच्यावर सुद्धा पळवाटा काढून हातात सुपारी देऊन लेखकाचं लग्न केलं जातं आणि अखेर लेखकाला जातीत प्रवेश मिळतो. ज्या जातीच्या जाळ्याला लेखक आयुष्यभर कापण्याचा प्रयत्न करत असतो. त्यासाठी मोर्चे, बैठका, उपोषण, धावाधाव करीत असतो. त्या जातीच्या जंजाळात त्याची स्वत:ची माणसंच त्याला अडकवतात.

संपूर्ण पुस्तक वाचता लेखकाने आपली लहानपणापासूनची शाळा शिकण्याची जिद्द बांधून ठेवलेली असते. त्यासाठी तो घरदार सोडतो. सामाजिक जाणीव झाल्यावर जातीचा प्रश्न निकालात काढायला तो निघतो आणि शेवटी जातीतच त्याला सामील व्हावं लागतं.

आपल्या जीवनाची कैफियत तो आपल्यापुढं मांडतो. अनेक नोकऱ्या सोडाव्या लागल्या तरी आपला स्वाभिमान तो टिकवत असतो. उपाशी राहून तो स्वाभिमान जगवतो आणि अखेर जातीपुढे त्याला स्वाभिमान गुंडाळावा लागतो.

जातीव्यवस्थेविषयी मनातून अत्यंतिक चीड. आपल्या समाजाला हक्क मिळावे आपला समाज सज्ञान व्हावा यासाठी मनोमन कळकळ आणि जे आपण आपल्या आई-वडिलांनी अन्यायात्मक आणि लाचारीचं जीणं जगलं त्याविरुद्ध वाचा फोडण्याचा हा प्रयत्न लेखक या पुस्तकाद्वारे करतो.

•••

# परिसर वार्ता

विद्या प्रसारक मंडळातर्फे दि. ६ सप्टेंबर २००३ रोजी 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी श्री. द. म. मेहेंदळे (निवृत्त मुख्याध्यापक, महाराष्ट्र विद्यालय) हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी भूषविले. मंडळाचे उपाध्यक्ष श्री. वि. करंदीकर हेही उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा.वि.) च्या शिक्षिका सौ. सुनीता देशपांडे यांनी आपल्या ओघवत्या, सहजसुंदर शैलीत केले. कार्यक्रमाची सुरुवात सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन करून झाली. त्यांना सौ. वीणा जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रास्ताविक करताना वि.प्र. मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्याविषयीचे विचार मांडले. तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचयही करून दिला. त्यानंतर दरवर्षी शिक्षक दिनाच्या दिवशी शाळेतील १० ते २० वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांचा गौरव करण्यात येत असे. या वर्षापासून शाळेतील शिक्षकांबरोबर कनिष्ठ महाविद्यालया (आर्टस्, कॉमर्स व विज्ञान) मधील २० वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांनाही अल्पशी भेट देऊन गौरविण्यात आले.

याच कार्यक्रमात कै. सौ. सुमतीबाई टिळू पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे नाव जाहीर करण्यात आले. या वर्षीच्या या पुरस्काराचे मानकरी आहेत श्री. प्र.वा. कुळकर्णी (पर्यवेक्षक, डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा.वि.). श्री. एम्. एस्. दिक्षित यांनी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या वतीने आभार मानले.

श्री. द.म. मेहेंदळे यांनी आपली ओळख करून देताना एक किस्सा सांगितला. त्यांना एकदा विचारण्यात आले 'आपली जात कोणती ?' ते म्हणाले, 'शिक्षक'. परत विचारले गेले, 'तुमचा धर्म कोणता?'. ते म्हणाले, 'शिकवणे हा माझा धर्म.' मला वाटते सर्व शिक्षकांनी हे ध्यानात ठेवावे. शिक्षण या विषयाव्यतिरिक्त कुठल्याही विषयावर कुठेही बोलायचे नाही हा त्यांचा संकल्प. म्हणजे बोलायचे ते फक्त शैक्षणिक विषयांबरच. त्यांच्या मते शिक्षक म्हणजे लहानांनी मोठं व्हावं म्हणून मोठ्यांनी लहान होणारा. स्वाभिमान बाळगा अर्थात् तो सार्थ हवा.

शिक्षकांना मार्गदर्शन करताना ते पुढे म्हणाले शिक्षण देणे म्हणजे सामुदायिक जबाबदारी आहे. यासाठी स्वत:ला कमी लेखू नका. डोळसपणे इकडे तिकडे पहा. चौकस रहा. मुलं आपल्यावर जास्त विश्वास ठेवतात. शिक्षकी पेशा हे व्रत आहे. व्यवसाय नाही. शिक्षकाने आत्मचिंतन करावं. Born teacher आणि Made teacher यात फरक आहे. हे सांगताना त्यांना त्यांच्या शिक्षकांचे स्मरण झाले त्याबद्दल ते म्हणाले, 'आमचे लेले गुरुजी पहाटे कंदील हातात घेऊन पुलाजवळ उभे राहून विद्यार्थ्यांना बोलावून शिकवत असत. ते त्यांचे संस्कार अजूनही पुसले गेले नाहीत. आपलेही स्मरण आपल्या विद्यार्थ्यांनी ठेवावे असे वागले पाहिजे. कारण आपले विद्यार्थी म्हणजे Best Judges असतात. ते आपल्या बारीक सारीक कृतीचे अवलोकन करत असतात. आपल्याविषयी अटकळ बांधत असतात. आपण झपाटलेले असायला हवे. शिकवणे हा ध्यास हवा. We are good, don't desire to be better but try to be the best. कुणी आपल्याकडे वाईट अर्थाने बोट दाखवेल असे वागू नका. नवनवीन शैक्षणिक उपक्रम राबवा' जेणेकरून विद्यार्थ्यांना अडचणी राहणारच नाहीत. विद्यार्थ्यांशी मानसिक जवळीक ठेवा त्यांच्या शाळेच्या संदर्भातील अडचणी समजून घ्या. कारण विद्यार्थी सुधारले तरच आपलं यश. नाही सुधारले तर आपण अपयशी ठरु. शिक्षकाने सामाजिक

बांधिलकीचेही भान ठेवावे. हे सांगताना ते म्हणाले, मी माझ्या आई-वडिलांचे श्राद्ध वेगळ्या प्रकारे करतो ते असे की वर्षाला निदान दोन मुलांचा गणवेषाचा खर्च करतो. मुख्याध्यापक म्हणून मार्गदर्शन करताना शाळेची जबाबदारी ही मुख्याध्यापकावर असते त्याने वेळेचे बंधन पाळले पाहिजे. वर्गावर वेळेवर गेले पाहिजे इतर सहकारी शिक्षकांशी मोकळेपणाने वागले पाहिजे असे ते म्हणाले.

एकंदरित त्यांच्या भाषणातून जाणवले ते म्हणजे विद्यार्थी, ज्ञाननिष्ठा, समाजनिष्ठा याविषयी प्रेम हवे.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (माध्यमिक विभाग)

जून २००३ ते सप्टेंबर २००३ या कालावधीत सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळेत संपन्न झालेले कार्यक्रम :-

सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेत वर्षाच्या सुरुवातीलाच सवंध वर्षाच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक आखलेले असते. नियोजित वेळापत्रकाप्रमाणे पार पडलेले कार्यक्रम :-

### जून २००३

२५ जून - कै. रोशन पटेल यांच्या स्मरणार्थ चित्रकला स्पर्धा

२६ जून - इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा - इ.५वी ते इ. ९वी

२७ जून - मराठी हस्ताक्षर स्पर्धा - इ. ५ वी ते इ. ९वी

२८ जून - कथाकथन सौ. आगाशे - इ. ५ वी

### जुलै २००३

यावर्षी शाळेत प्रथमच 'स्कूल पार्लमेंट'ची स्थापना झाली. इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांची नियुक्ती करण्यात आली.

४ जुलै - इंग्रजी पाठांतर स्पर्धा - इ. ५वी ते इ. ९वी

५ जुलै - इंटरॲक्ट क्लब उद्घाटन

५ जुलै - मराठी पाठांतर स्पर्धा - इ.५ वी ते इ. ९वी

१२ जुलै - ८ वी (Hike)

१४ जुलै - इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा - इ. ५वी ते इ. ९वी

१५ जुलै - मराठी वक्तृत्व स्पर्धा - इ. ५वी ते इ. ९वी

१६ जुलै - हिंदी वक्तृत्व स्पर्धा -इ. ५वी ते इ. ९वी

१७ जुलै - व्याख्यान सौ. मराठे - इ. १०वी मराठी व्याकरण

१९ जुलै - व्याख्यान मंजुषा अमीन - इ. १० वी

२५ जुलै - सर्प प्रदर्शन व व्याख्यान श्री. भरत जोशी इ. ७ वी, ९ वी, १० वी

२६ जुलै - (१० वी) Hike

### ऑगस्ट २००३

२ ऑगस्ट - कथाकथन सुमति निगुडकर इ. ६ वी

५ ऑगस्ट - कै. गुणाकार जोशींच्या स्मरणार्थ विशेष प्रावीण्य दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी

१३ ऑगस्ट - संस्कृत दिवस - संस्कृतमधून कथा, भाषण गीत गायन

१६ ऑगस्ट- पथनाट्य- स्वाध्याय परिवार इ. ८वी,१०वी

१८ ऑगस्ट- अथर्वशीर्ष सहस्त्रावर्तन - श्री. अष्टपुत्रे इ. ६ वी व ७वी

२३ ऑगस्ट- व्याख्यान - श्री. वैद्य इ. ८ वी

२३ ऑगस्ट - व्याख्यान - गीतगायन स्पर्धा इ. ५ वी ते १० वी

२५ ऑगस्ट- कथाकथन - सिंधुताई आंबिके (इ. ५वी)

### सप्टेंबर २००३

५ सप्टेंबर - शिक्षक दिन - विद्यार्थ्यांची भाषणे, गीत गायन

१० सप्टें. - डॉ. होमी भाभा सायन्स सेंटरला भेट इ.६वी

१२ सप्टें. - हिंदी दिवस हिंदीतून कथा भाषण गीत गायन

१३ सप्टें. - व्याख्यान - मनोविकास Institute for pscycological health (इ. १० वी)

१५ सप्टें. - अंतरशालेय नाट्यस्पर्धा - हिंदी नाटक कुमार कला केंद्र

१६ सप्टें. - कॅम्लिन कंपनीला भेट इ. ६ वी

१७ सप्टें. - अंतरशालेय लोकनृत्य स्पर्धा - कुमार कला केंद्र

१९ सप्टें. - श्रीकला नाट्य संस्था - नाट्यस्पर्धा - मराठी नाटक

### सहल

पिकनिक, रोझ डे, फ्रेंडशिप डे अशा अनेक दिवसांचे सेलिब्रेशन नवरंग उत्सव या जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या जगतातील अविभाज्य गोष्टी.

२३ ऑगस्ट, २००३ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनींची सहल बदलापूर येथील 'रेनी रिसॉर्ट' येथे आयोजित करण्यात आली. दोन बसमधून गेलेल्या विद्यार्थ्यांबरोबर प्राध्यापक मंडळी देखील होती. गरम गरम बटाटेवडे व चहा, कॉफी घेऊन मुलांनी मोर्चा वळविला तो रिसॉर्टमधील वॉटरपार्ककडे. या वॉटरपार्कमधील नेक कसरतींत अक्षरश: बुडालेल्या विद्यार्थ्यांना प्राध्यापक मंडळींनी काठावर तसेच राहणे मान्य नसल्यामुळे आपल्यात ओढून नेले. दिवसभर धमाल करून सायंकाळी पाच वाजता मुले महाविद्यालयाकडे परत निघाली.

### राज्यशास्त्र विभाग

तृतीय वर्षाच्या परिक्षेत प्रथम श्रेणी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार ही राज्यशास्त्र विभागाची परंपरा. या परंपरेनुसार २ ऑगस्ट २००३ रोजी हा कौतुकाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वर्षी प्रथम श्रेणी मिळवणारी एकमेव विद्यार्थिनी शर्मिला कलगुटकर हिला कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले. विभागप्रमुख सौ. लुकतुके यांनी तिची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. यानंतर प्रोजेक्टची तयारी, लिखाणाचा सराव, आधीच्या वर्षीचे पेपर सोडविणे अशा अनेक विषयांवर तिने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांकडून आलेल्या अनेक प्रश्नांना उत्तरे दिली. पुष्पगुच्छ व छोटीशी भेट देऊन या प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनीचे कौतुक करण्यात आले.

२००३-०४ या शैक्षणिक वर्षातील राज्यशास्त्र विभागाचा पहिला कार्यक्रम गुरुवार २४ जुलै रोजी झाला. हा कार्यक्रम प्रामुख्याने तृतीय वर्ष राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांकरिता होता. कार्यक्रमास किर्ती महाविद्यालयातील डॉ. अशोक जैन यांना वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले. स्वयंसेवी संस्था ज्यांना आज Civil Society असे संबोधण्यात येते त्यांच्याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. भारतातील स्वयंसेवी संस्था, त्यांची वैशिष्ट्ये याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. डॉ. अशोक जैन यांची ओळख राज्यशास्त्र विभागप्रमुख सौ. गिता लुकतुके यांनी करून दिली. प्रा. प्रियवंदा टोकेकर यांनी मानलेल्या आभारांनी कार्यक्रमाचा समारोप झाला.

### मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन

भावना, उत्कंटता आणि सौंदर्य यांचा मनोहर संगम ज्या कवितेत झालेला असतो तिच खरी कविता होय. अशीच कविता रसिक मनालाभावत असते, असे उद्गार 'कुटुंब रंगलंय काव्यात'चे सादरकर्ते प्रा. विसूभाऊ बापट यांनी काढले.

येथील जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य

स. बा. गोखले होते. व्यासपीठावर उपप्राचार्य अशोक वडगुजर, उपप्राचार्य शोभा दोषी मराठी विभागप्रमुख प्रा. दामोदर मोरे उपस्थित होते.

प्रा. बापट म्हणाले की, मराठीच्या ऱ्हासाला मराठी माणूसच कारणीभूत आहे. मी मराठीतच बोलेन अशी प्रतिज्ञा मराठी माणसाने केली पाहिजे. आज तळागाळांतील अपरिचित कवी मराठी कवितेची उपासना आणि जोपासना कशी करीत आहेत हे त्यांनी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केली.

यावेळी त्यांनी 'कुटुंब रंगलय काव्यात' हा बहारदार कार्यक्रम सादर करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य गोखले यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये मराठी वाङ्मय मंडळाचे कार्य कसे मोलाचे आहे ते सांगितले.

मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष मराठी विभागप्रमुख प्रा. दामोदर मोरे म्हणाले, 'ग्रहण, धारण आणि स्मरणशक्तींचा सुंदर मेळ विसूभाऊ बापटांच्या व्यक्तिमत्वात असल्याचा प्रत्यय येतो. म्हणूनच त्यांना शेकडो मराठी कविता पाठ आहेत आणि त्या रसिकतेने रसिकापर्यंत पोहोचवत आहेत.

### बांदोडकर महाविद्यालयात हिंदी दिन साजरा

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात दि. १५ सप्टेंबर रोजी हिंदी दिनानिमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रा. प्रकाश बच्छाव यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपली 'दहकते अंगारे' ही कविता सादर केली व वातावरण भारावून गेले. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मकरंद दीक्षित अध्यक्षस्थानी होते.

हिंदीचे प्रा. अनिल आठवले मार्गदर्शन करता म्हणाले, 'हिंदी यह हिंदुस्तान की पहचान थी और सदाही रहेगी.' कार्यक्रम आयोजनासाठी विशेष प्रयत्न करणारे विद्यार्थी अवदेश यादव, विजय सिंह, राजीव झा, तरन्नुम कल्पना जैन, सौची त्रिपाठी या विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या व भाषण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सौची त्रिपाठी हिने केले.

प्रा. दिक्षित सरांनी हिंदी दिनानिमित्ताने शुभेच्छा व्यक्त करणारे मनोगत अध्यक्षीय भाषणात सांगितले.

### बांदोडकर महाविद्यालयास नॅकचा बी++ दर्जा

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास अलिकडेच राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेच्या प्रतिनिधी मंडळाने महाविद्यालयाचे मूल्यांकन करण्याच्या दृष्टीने भेट दिली होती.

सदर भेटीचा अहवाल महाविद्यालयास प्राप्त झाला असून त्यानुसार महाविद्यालयास बी++ हा दर्जा मिळाला आहे. या दर्जानुसार महाविद्यालयाचे मूल्यांकन ८० ते ८५% असे आहे.

या प्रतिनीधी मंडळाकरिता अहवाल तयार करण्यासाठी गणित विभागाचे प्रमुख प्रा. राधेश्याम पोद्दार यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाच्या सर्वच कर्मचाऱ्यांनी जीवापाड मेहनत घेतली. आजी माजी विद्यार्थ्यांनीही तितक्याच उत्साहाने या भेटीस प्रतिसाद दिल्याने महाविद्यालयास हा दर्जा मिळाला आहे. यामध्ये विद्याप्रसारक मंडळाचे पदाधिकारी महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थीवर्ग यांचा मोलाचा वाटा आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील व उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी सर्व सहकाऱ्यांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### विद्याप्रसारक मंडळ तंत्रनिकेतनात रक्तदान शिबीर संपन्न

विद्या प्रसारक मंडळ तंत्रनिकेतनाने दिनांक १

ऑक्टोबर रोजी रक्तदान शिबीर आयोजित केले.

रक्तदान शिबीर सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत होते. या रक्तदान शिबिराला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. तंत्रनिकेतनातील कर्मचारी व विद्यार्थी मिळून ३० जणांनी रक्तदान केले. त्यांना ठाणे जिल्हा रुग्णालयातर्फे प्रशस्तिपत्रक देण्यात आले. जिल्हा रुग्णालयातर्फे डॉ. मोहनाळकर आणि त्यांचे सहकाऱ्यांचे शिबिराला सहकार्य लाभले.

प्राचार्य एस.एस. मुजुमदार, उपप्राचार्य डी.के. नायक, वरिष्ठ व्याख्याता मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी हे शिबीर यशस्वीरित्या पार पाडले. या प्रसंगी मंडळाचे उपाध्यक्ष श्री. करंदीकर विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थित होते.

### बांदोडकर महाविद्यालयात रक्तदान शिबीर

राष्ट्रीय सेवा योजना आणि छात्रदल यांच्या सहकार्याने रोटरी क्लब यांनी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात रक्तदान शिबिर आयोजित केले.

ठाणे कॉलेजच्या जिमखान्यामध्ये हे शिबीर गुरूवारी पार पडले. या शिबिरात सुमारे दोनशे विद्यार्थ्यांनी भाग घेतला. शिबिरात राष्ट्रीय सेवादल, एन.सी.सी. रोटरी क्लब ऑफ ठाणे, कळवे, अपटाऊन आणि इंडियन रेडक्रॉस या सामाजिक संघटना सहभागी झाल्या होत्या. शिबिराचे उद्घाटन कॉलेजच्या उपप्राचार्या डॉ. एम.के.पेजावर यांनी केले.

### डॉ. बेडेकर विद्यामंदिर आयोजित सण व उत्सव

अभ्यासाबरोबरच भारतीय परंपरांची, संस्कृतीची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी म्हणून ठाण्यातील डॉ. बेडेकर विद्यामंदिर, पूर्व प्राथमिक विभागातर्फे शाळेच्या विद्यालंकार सभागृहात 'सण व उत्सव प्रकल्प' या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रकल्पाचे उद्घाटन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते शुक्रवार दि. १९ सप्टेंबर रोजी झाले. यावेळी पूर्व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर, सेवानिवृत्त शिक्षक तथा पत्रकार प्र.ग. वैद्य, कमलाकर भागवत, सौ. आशा मंडपे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रदर्शनात मार्गशीर्ष ते फाल्गुन महिन्याच्या काळात येणाऱ्या सणांची सविस्तर माहिती चित्रांसहित प्रात्यक्षिकाद्वारे देण्यात आली आहे. सर्व चित्रांची रचना अतिशय मेहनत घेऊन केलेली आहे. यात देवदिवाळी, खंडोबाचे नवरात्र, नाग दिवाळी, गीता जयंती, मकर संक्रांत, महाशिवरात्र, मोहिनी राजाचे नवरात्र, रथसप्तमी, तेलफळादेवी उत्सव, म्हसोबाची जत्रा, वेताळ पूजा, रेणुकादेवी उत्सव, माघी गणेशोत्सव, बोरन्हाण, रंगपंचमी, वडामपूजा (बंगाली उत्सव), मार्गशीर्ष लक्ष्मीव्रत इत्यादी सुमारे २१ सण उत्सव दाखविले होते.

या प्रदर्शनासाठी मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य यांच्या मार्गदर्शनाने शाळेतील शिक्षिका सौ. श्वेता कोकीळ, सौ. पूर्वा खरे, सौ. सीमा केळकर, सौ. सुप्रिया जोशी, सौ. अंजली पटवर्धन, सौ. नेहा जोगळेकर, सौ. सुलक्षणा पाध्ये, सौ. मनाली दिवेकर, सौ. सुचिता सराफ, सौ. केतकी अंबिके, सौ. शिल्पा पनशीकर, लेखनिक यांनी तसेच पालकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी भरपूर मेहनत घेतली.

- संकलित